नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २१३ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. १४ जुलै २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### तहसीलदार श्रीकांत पाटील निलंबित

इंदापूर (स. गांवकरी) : इंदापूरचे तत्कालीन तहसीलदार तथा सध्या विशेष भूसंपादन अधिकारी (माप-२), धाराशिव येथे कार्यरत असलेले श्रीकांत पाटील यांना महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने तत्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. पुणे जिल्ह्यातील एका जमीन प्रकरणात महसूल संहितेच्या तरतुदींचे उल्लंघन करून गंभीर अनियमितता केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली आहे. शासनाने १० जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार, पुणे जिल्ह्यातील महत्त्वाच्या जमीन प्रकरणात चौकशीअंती श्रीकांत पाटील यांनी नियमबाह्य पद्धतीने कामकाज केल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणाची शासनस्तरावर विशेष समितीमार्फत चौकशी करण्यात आली होती. समितीच्या अहवालावर विभागीय आयुक्त, पुणे यांनी छाननी करून शासनाकडे अहवाल सादर केला होता.

### लाभासाठी विशेष मोहीम

गंगापूर (स. गांवकरी) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार यांनी विधानसभेत केलेल्या घोषणेनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ मधील अनेक अटी शिथिल व रद्द करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकरी बांधवांनाही आता कमाल २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील ५६ लाखांहून अधिक शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. यासंदर्भात आज गंगापूर तहसील कार्यालयात आमदार प्रशांत बंब यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन करून योजनेची सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी हिताला प्राधान्य देत कर्जमाफीतील अनेक त्रुटी व अटी दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. विशेषतः महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पूर्वी केवळ ५० हजारांपर्यंत कर्जमाफीची मर्यादा होती. तसेच, थकीत कर्ज ५० हजारांपेक्षा जास्त असल्यास उर्वरित रक्कम स्वतः भरल्यानंतरच या लाभासाठी पात्रता मिळत होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ही अट रद्द करण्याची घोषणा केली असून, आता अशा शेतकरी बांधवांनाही थेट २ लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे.

### वयाच्या ५४ वर्षीही लाचेचा मोह!

सोलापूर (स. गांवकरी) : शेतातील विहीर खोदकामातून निघालेल्या मुरुमाची वाहतूक व वापरासाठी परवानगी मिळावी म्हणून तक्रारदाराने उत्तर सोलापूरच्या तहसीलदारांकडे अर्ज केला होता. अर्जानुसार स्थळ पाहणी करून तहसीलदारांना सकारात्मक अहवाल पाठविण्यासाठी मंडलाधिकाऱ्याने तक्रारदाराकडे एक लाखाची लाच मागितली. त्याअनुषंगाने पडताळणीअंती सोलापूरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंडलाधिकाऱ्यास अटक केली. त्याच्याविरुद्ध सलगर वस्ती पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजयकुमार माने (वय ५४) असे त्या मंडलाधिकाऱ्याचे नाव आहे. तक्रारदाराचा मुरूम वाहतुकीचा व्यवसाय आहे. बेलाटी येथील एका विहिरीचे काम सुरू असून त्याठिकाणचा मुरूम वाहतूक करण्यासाठी तहसीलदारांकडून परवानगी मिळावी म्हणून तक्रारदाराने अर्ज केला होता. काही दिवसांनी तो अर्ज तहसील कार्यालयातून तिऱ्हे येथील मंडलाधिकारी विजयकुमार माने याच्याकडे स्थळ पडताळणीसाठी पाठविण्यात आला होता.

# सरकारचा डोळा आता एसटीच्या जागांवर

### खाजगीकरणचा घाट

मुंबई : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) डेपोच्या पुनर्विकासातून उत्पन्न वाढवून महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक डेपोची क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र विकास आराखडा तयार करावा. तसेच, सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या माध्यमातून पुनर्विकासाला गती देण्यासाठी आवश्यक धोरणात्मक प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाची बैठक वर्षा या शासकीय निवासस्थानी झाली. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए.शैला, महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, एसटी डेपो विकसित करतांना प्रत्येक डेपोची व्यावसायिक क्षमता लक्षात घेऊन स्वतंत्र नियोजन करण्यात यावे. आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य



### मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब विकसित करावा

प्रवाशांना अधिक सुलभ व अखंडित सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटी डेपो, मेट्रो आणि अन्य सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे एकात्मिक नियोजन करून मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब विकसित करण्यावर भर देण्याचेही निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

प्रकल्पांमधून प्राप्त होणारा निधी एस्क्रो खात्यात जमा करून त्याचा वापर इतर विकास प्रकल्पांसाठी करण्यात यावा. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) धोरणांतर्गत विकासकांना देण्यात येणाऱ्या सवलतींबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. एसटी महामंडळाच्या जागांची मालकी कायम महामंडळाकडेच राहील, यासाठी ४९ अधिक ४९ वर्षांच्या लीज मॉडेलचा विचार करण्यात येत असून, त्यामुळे जागांचे प्रभावी व्यावसायिक मूल्यवर्धन साधता येईल. तसेच, प्रकल्पांसाठी स्टॅम्प ड्युटी सवलतीसंदर्भातील कायदेशीर बाबींची तपासणी करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

शहरी विकासात सृजनशील बदल घडवून आणण्यासाठी शहरांना विकासाचे केंद्र मानून त्यांच्या प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी अर्बन चॅलेंज फंडच्या माध्यमातून विकास करण्यात यावा. शहरांच्या सर्जनशील विकासासाठी या अभिनव अभियानामुळे नागरी पायाभूत सुविधा आणि सेवा वितरणात लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' निवासस्थानी नगर विकास विभागाच्या आढावा बैठकीत अर्बन चॅलेंज फंड अभियानाच्या आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वित्त व नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करताना महाराष्ट्राने या दृष्टीने पावले टाकली असून यापूर्वी नाशिक आणि पुणे महानगरपालिकेत या धर्तीवर निधी उभारणी करून पाणी पुरवठा व स्वच्छता यासाठी निधी उभारले आहेत.

या महानगरपालिकांच्या निधी उभारणीसाठी राष्ट्रीय सर्वोच्च समितीची (एनएसी) मंजुरी देखील मिळाली आहे तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि नागपूर महानगरपालिका येथील काही प्रकल्पांना या पद्धतीने निधी उपलब्ध होणार आहे असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# देवकुंड दुर्घटनेनंतर २५ जणांविरोधात गुन्हा दाखल; पोलिसांची कारवाई

अलिबाग : (स. गांवकरी)



देवकुंड धबधब्यात रविवारी पुण्यातील दोन पर्यटकांचा बुडून मृत्यू झाल्यानंतर पोलिस प्रशासनाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरू केली आहे. पावसाळ्यात देवकुंड धबधब्यासह प्रतिबंधित पर्यटनस्थळी प्रवेश करून देणारे पर्यटक, स्थानिक मार्गदर्शक, बुकिंग करणारे व्यावसायिक अशा २५ जणांविरोधात माणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संकेतस्थळांद्वारे आरक्षण करणाऱ्यांविरोधातही स्वतंत्र गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉइंट आणि कुंभे परिसरात पावसाळ्यात प्रवेशबंदीचे आदेश उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी लागू केले आहेत. असे असतानाही रविवारी चाकण येथून आलेल्या २२ जणांच्या समूहाने या आदेशांचे उल्लंघन केल्याचे तपासात समोर आले आहे.

या समूहाला तेथे बंदोबस्तावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी देवकुंड धबधब्याकडे जाण्यास स्पष्ट मनाई केली होती. मात्र, पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून स्थानिक मार्गदर्शक आणि संबंधित व्यावसायिकांनी पर्यटकांना पर्यायी मार्गाने धबधब्याकडे नेल्याचा आरोप आहे. त्यानंतर झालेल्या दुर्घटनेत पुण्यातील दोन पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणी प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पर्यटक, स्थानिक मार्गदर्शक आणि संबंधित व्यावसायिकांविरोधात माणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय सामाजिक माध्यमे आणि संकेतस्थळांच्या माध्यमातून पर्यटकांची नोंदणी व आरक्षण करणाऱ्यांची माहितीही पोलिसांकडून गोळा केली जात असून, त्यांच्याविरोधात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिस निरीक्षक संजय बांगर यांनी सांगितले. देवकुंडसह पावसाळ्यात धोकादायक पर्यटनस्थळी प्रवेशबंदीच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे वर्षा सहलीसाठी माणगाव परिसरातील कुंभे सिक्रेट पॉईंट आणि देवकुंड धबधबा परिसरात येण्याचा विचार करत असाल तर जरा जपून या सहलीमुळे तुमचे जीव धोक्यात येऊ शकतातच त्याशिवाय पोलीस कारवाईलाही सामोरे जावे लागू शकते.

# राम मंदिर ट्रस्ट घोटाळ्याप्रकरणी अहिल्यानगरमध्ये काँग्रेसचे आंदोलन




अहिल्यानगर : (स. गांवकरी)


अयोध्येतील श्रीरामजन्मभूमी ट्रस्टमधील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी विश्वस्तांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी शहर जिल्हा काँग्रेसने आज, सोमवारी तोफखाना पोलीस ठाण्यासमोर वारकरी व टाळकऱ्यांच्या वेशात जाऊन तक्रार अर्ज दाखल केला. कार्यकर्त्यांनी नंतर लालटाकी भागातील गोगादेव मंदिर येथे 'रघुपति राघव राजाराम', हे भजन म्हटले तसेच मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्राच्या नावावर भ्रष्टाचार करणाऱ्यांना सद्बुद्धी देवो, अशी प्रार्थनाही केली. कार्यकर्त्यांनी हातात टाळ व मागण्यांचे फलक घेऊन 'मुह मे राम, बगल मे तिजोरी', 'श्रीराम मंदिर वाचवा', 'चोरी करणाऱ्यांना घरी पाठवा', 'रामभक्तांच्या देणगीचा हिशेब द्या', 'श्रीरामाच्या नावावर भ्रष्टाचार चालणार नाही', अशा घोषणा दिल्या. काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, नगरसेवक शम्स खान, माजी नगरसेवक फैयाज शेख, शहराध्यक्ष फिरोज खान, शामराव वाघस्कर, अभिजीत कांबळे, संजय झोडगे, अँड. साहेबराव चौधरी, राजेंद्र कर्डिले, गणेश भोसले, सुनील छेत्रे, प्रा. रवी पाचपुते, मयूर पाटोळे आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

# दुसऱ्याचा जीव जाणार नाही याची काळजी घ्या : तुकाराम मुंढे

मुंबई : (स. गांवकरी)

मुंबईसह राज्यभरात तुकाराम मुंढे हे चर्चेत आले आहेत. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांनी भेसळयुक्त पदार्थ, त्याचे उत्पादक आणि विक्रेते यांच्या विरोधात घेतलेली धडक कारवाईची भूमिका. तुकाराम मुंढे हे FDA चे आयुक्त म्हणून काम करत आहेत. त्यांच्या धडक कारवाईचा धसका अनेकांनी घेतला आहे. कुठल्याही परिस्थितीत लोकांनी भेसळयुक्त पदार्थ खायला नको ही भूमिका तुकाराम मुंढेंनी घेतली आहे. इतकंच नाही तर लोकांनीही त्यांची जबाबदारी ओळखून वागलं पाहिजे असंही ते म्हणाले आहेत. शिवाय भेसळखोरांनाही त्यांनी विनंतीवजा सूचना केली आहे.

FDA चा आयुक्त म्हणून काही मिळवायचं आहे तर ते हेच आहे की नागरिकांनी सजग राहून भेसळीच्या विरोधात एक चळवळ उभी केली पाहिजे. चांगले पदार्थ खाण्याची सवय लागली पाहिजे असं मत तुकाराम मुंढे यांनी मांडलं



आहे. भेसळयुक्त पदार्थ विक्री रोखायची असेल तर महाराष्ट्रातल्या १३ कोटी लोकांनी ही जबाबदारी घेतली पाहिजे. आम्ही कारवाई करायची आहे ती करुच. समाजाकडे कुटुंब म्हणून बघा, सगळ्या गोष्टी सुरळीत व्हायला वेळ लागणार नाही. आपल्या कुटुंबाकडे जसं आपण जबाबदारीने पाहतो तसं समाजाकडे कुटुंब म्हणून पाहावं असं मला वाटतं अशी अपेक्षा तुकाराम मुंढेंनी व्यक्त केली आहे.

माझं इतकंच म्हणणं आहे FBO म्हणजेच फूड बिझनेस ऑपरेटरमध्ये

### नफ्याच्या हव्यासापोटी दुसऱ्याचा जीव जाणार नाही याची काळजी घ्या : तुकाराम मुंढे

यानंतर पुढे तुकाराम मुंढे म्हणाले, दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा समाजात आपण माणूस म्हणून राहतो त्यामुळे तात्विक आणि नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे नैतिक आणि कायदेशीर पातळीवर तुम्ही तुमची जबाबदारी वेळीच ओळखा. आपल्या चुकीमुळे, नफ्याच्या हव्यासापोटी दुसऱ्याचा जीव जाणार नाही याची काळजी घेतली तर रेग्युलटरचं काम हे निश्चितपणे यशस्वी झालं असं मला वाटेल. कमीत कमी आणि महाराष्ट्रात आणि भारतात या सगळ्याची जास्त काळजी घेतली पाहिजे. ही माझी सगळ्यांना विनंतीवजा सूचना आहे.

आपण उत्पादक असाल, साठवणूक करणारे असाल, माल वाहतूक करणारे असाल, विक्रेते असाल, डिलर असाल, सेमी डिलर असाल कुणीही असूद्या सगळ्यांना मी हे सांगू इच्छितो की आपण या जनतेमुळे आहोत. तुमचं उत्पादन कुणीतरी ग्राहक विकत घेतो. त्यामुळे तुमचा व्यवसाय चालतो. हा व्यवसाय करताना जी नियमावली घालून दिली आहे, अन्न सुरक्षेबाबतचे जे नियम आहेत, अन्न सुरक्षा, त्याचा दर्जा याबाबतचे जे नियम आहेत त्यात कुठलीही तडजोड करु नका. अन्यथा याचा परिणाम समाजावर तर होणारच आहे, पण तुमच्यावरही एक ग्राहक म्हणून याचा परिणाम होईल. कदाचित तुमच्या भागात तो पदार्थ तुम्ही सगळ्या नियमांनुसार काटेकोर पद्धतीने विकत असाल, उत्पादन करत असाल पण बाकीच्या गोष्टी जेव्हा तुम्ही खाता त्या भेसळयुक्त किंवा दर्जा नसलेल्या या तुम्हालाही मिळू शकतात.

# खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना ३.५ तास विलंब!

### आंदोलनापूर्वीच कार्यकर्ते ताब्यात; वाकचौरे रवाना झाल्यानंतर सुटका



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

ठाकरे गटातून फुटून शिंदे गटात सहभागी झालेले शिवसेनेचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना काळे फासण्याचे आंदोलन करण्यापूर्वीच ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना तोफखाना पोलिसांनी ताब्यात घेतले. मात्र या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे खासदार वाकचौरे आज, सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीच्या (दिशा) सभेस ३.५ तास उशिरा दाखल झाले, तेही पोलीस बंदोबस्तात! शिवसेनेच्या ठाकरे गटाचे ६ खासदार काही दिवसांपूर्वी फुटले व शिंदे गटात सहभागी झाले. त्यामध्ये खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांचाही समावेश आहे. वाकचौरे यांनी गद्दारी केल्याचा आरोप करत ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी नगरमध्ये आंदोलन केले होते. त्यावेळी वाकचौरे नगरमध्ये आल्यास त्यांना काळे फासण्याचा इशारा ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांनी दिला होता. आज जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार वाघचौरे यांच्या अध्यक्षतेखाली दिशा समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. समितीचे सहअध्यक्ष शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके उपस्थित होते. सभेची वेळ दुपारी १२.३० वा. होती. सभेस वाकचौरे येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात ठाकरे गटाचे पदाधिकारी आंदोलनासाठी जमा होऊ लागले. त्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्याची पूर्वसूचना खासदार वाघचौरे यांना दिली.

तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक बालाजी वैद्य यांनी आंदोलनापूर्वीच गिरीश जाधव यांच्यासह दहा कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले व पोलीस व्हॅनमध्ये बसवून पोलीस ठाण्यात नेले. ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेतल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याची सूचना पोलिसांनी खासदार वाकचौरे यांना केली होती. त्यामुळे खा. लंके सरकारी विश्रामगृहावर ताटकळत थांबून होते, सभेस आलेले अनेक अधिकारीही ताटकळले होते.

दुपारी ३.३० वा. पोलिसांनी आंदोलक गिरीश जाधव, साजिद सय्यद, बशिद तांबटकर, अशोक पारधे, योगेश जाधव, राम साळवे, किरण पाडळे, अमोल पाडले, गणेश कांबळे, अक्षय साळवे या आंदोलकांना पोलीस ठाण्यात नेले त्याचा संदेश वाकचौरे यांना मिळाल्यानंतर सायंकाळी चार वाजता वाकचौरे पोलीस बंदोबस्तात जिल्हाधिकारी कार्यालयात हजर झाले व सभेस उपस्थित राहिले. वाकचौरे सायंकाळी ६.३० च्या सुमारास बैठक संपल्यानंतर रवाना झाले व पोलिसांनी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांची सुटका केली. दरम्यान खासदार वाकचौरे पुन्हा नगरमध्ये आल्यानंतर पुन्हा त्यांना काळे फासण्याचे आंदोलन केले जाईल असा इशारा गिरीश जाधव यांनी दिला आहे.

# सरकारी कांदा खरेदीचा बाजार उठला? दोन लाख टनांचे उद्दिष्ट्ये

मुंबई : (स. गांवकरी)

नाफेड आणि एनसीसीएफची यंदाची कांदा खरेदी अडचणीत आली आहे. पहिल्या टप्प्यात जूनअखेर दोन लाख टन कांदा खरेदीचे उद्दिष्टे होते, ते जुलैअखेरची मुदत वाढविण्यात आली तरीही निकष पूर्ण करणारा कांदा मिळत नसल्याची स्थिती आहे. १० जुलैपर्यंत जेमतेम १५ हजार टन कांदा खरेदी करता आला आहे. खरेदीचे दर, निकष बदलूनही खरेदी होत नसल्याची स्थिती आहे. त्यामुळे कमी दर्जाचा कांदा खरेदी करण्याची वेळ आली आहे. केंद्र सरकारच्या वतीने दर स्थिरीकरण आणि ग्राहक हितासाठी नाफेड आणि एनसीसीएफ या दोन सहकारी संस्था कांदा खरेदी करतात. यंदा पहिल्या टप्प्यात जूनपूर्वी दोन लाख टन खरेदीचे उद्दिष्टे होते. पण, खरेदी पूर्ण करता आली नाही. त्यामुळे पहिल्यादा प्रति टन १,५८० रुपये असलेला दर वाढवून १,८७५ रुपये करण्यात आला, तरीही कांदा मिळत नसल्याने त्यातही वाढ करून २,१२५ रुपये करण्यात आला. खरेदीची मुदत जूनअखेर वरून जुलैअखेर करण्यात आली. तरीही कांदा खरेदीला गती आली नाही. दहा जुलैअखेर जेमतेम १५ हजार टन कांदा खरेदी केल्याची माहिती राज्य सरकारकडून नुकत्याच संपलेल्या पावसाळी अधिवेशनात देण्यात आली. शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून (एफपीओ) खरेदीत



गैरव्यवहार होत असल्यामुळे यंदा कांदा खरेदी बाजार समित्यांमध्ये होईल. खरेदी केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील. कांद्याची प्रतवारी करण्याची सुविधा खरेदी केंद्रांवर उपलब्ध करून दिली जाईल, अशी घोषणा केली होती. प्रत्यक्षात यापैकी कोणत्याही घोषणेचे अंमलबजावणी झाली नाही, अशी टीका शेतकरी संघटनेचे नेते कुबेर जाधव यांनी केली आहे. नाफेड, एनसीसीएफच्या कांदा खरेदीचे २२ निकष आहेत, या निकषांवर पात्र ठरणारा कांदा २,१२५ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी केला जाणार होता. प्रत्यक्ष बाजारात या दर्जाच्या कांद्याला २२०० ते २५०० रुपयांचा दर मिळत आहे. त्यामुळे नाफेड आता पुन्हा एफपीओंकडून खरेदी प्रक्रिया राबविणार आहे. निकषात न बसणारा कांदा खरेदी करणे, कागदोपत्री खरेदी दाखविणे, खरेदी केलेला कांदा खराब झाला आहे, असे सांगून सरकारची फसवणूक करणे असे प्रकार आता सुरू होतील, अशी भीती कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी व्यक्त केली आहे.




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 मंगळवार दि. १४ जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुंबई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी




संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २१४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# विनापरवाना आयुर्वेदिक औषधसाठ्यावर एफडीएचा छापा

**५० लाखांचा साठा जप्त! कर्नाटकचा बादशाह महाराष्ट्रात बनलाय बोगस वैदू नावाचा वापर करून कोट्यावधी रुपयांना लावला चुना. कोल्हापूर सांगली मिरज भागात अनेकांची बनावट बोगस आयुर्वेदिक दुकाने आता तुकाराम मुंढे याकडे लक्ष देणार का**

पुणे (समर्थ गांवकरी)

**पुण्यातील शुक्रवार पेठ परिसरातील 'कल्पतरू आयुर्वेद' या आस्थापनेवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) धडक कारवाई करत विनापरवाना साठवून ठेवण्यात आलेल्या भस्म व इतर आयुर्वेदिक औषधांचा तब्बल ५०.३६ लाख रुपयांचा साठा जप्त केला. या कारवाईमुळे विनापरवाना औषध विक्री करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.**

एफडीएच्या औषध निरीक्षकांना संबंधित आस्थापनात विनापरवाना भस्म व रस औषधांची विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर छापेमारी करण्यात आली. तपासणीदरम्यान प्लास्टिकच्या पिशव्या, बरण्या आणि बाटल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर भस्म व इतर आयुर्वेदिक औषधांचा साठा आढळून आला.

तपासात या औषधांवरील बॅच क्रमांक, उत्पादनाची तारीख, मुदतबाह्यता तारीख, उत्पादकाचे नाव व पत्ता तसेच औषध उत्पादन परवाना क्रमांक यांसारखी कायद्यानुसार आवश्यक माहिती नमूद नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे या औषधांच्या गुणवत्तेवर आणि सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कारवाईदरम्यान आस्थापनाचे बोगस वैदू नावाचा वापर करून कर्नाटक राज्यातील कुडची बेळगावचा चालक राकेश राजेंद्र शिर्के.. मनोज शिर्के यांना संबंधित औषधसाठ्याच्या खरेदीची बिले, परवाने आणि मालकी हक्काची कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात आले. मात्र, ते कोणतीही वैध कागदपत्रे सादर करू शकले नाहीत. त्यामुळे संशयास्पद औषधसाठा जप्त करण्यात आला असून त्याची अंदाजे किंमत ५०.३६ लाख रुपये असल्याचे एफडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. यामधील खराब

**राज्यात बोगस आयुर्वेदिक दुकानांमधून मोठ्या प्रमाणात औषधी विक्री करणारे कर्नाटक राज्यातील बोगस वैदू राकेश उर्फ राजेश गुराणा. मनोज शिर्के सांगली जिल्ह्यातील दुर्गादास वैदू दिलीप वैदू सुरेश वैदू यांनी मोठा उच्छाद मांडला असून सांगली मिरज कोल्हापूर या ठिकाणाहून कोट्यावधी रुपयांची माया जमवली आयुक्त तुकाराम मुंढे बसवणार या वैदूंना आता फाशी द्या मराठा समाज संघटनेची मागणी...**

**महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अनेक पोलीस ठाण्यात यांच्यावर गुन्हे दाखल कुठे माशी शिंकली? सब गोलमाल है सब गोलमाल है याप्रमाणे शिर्के वैदु यांनी मांडला श्रीरामपूरचा खलनायक देखील आता बनला बोगस आयुर्वेदिक चा नेता**

**राकेश उर्फ राजेश गुराणा मनोज शिर्केवर या अगोदर देखील शंभर गुन्हे तर राजेश उर्फ राकेश गुराणा खुलेआम गावठी कट्टे तलवार घेऊन पुण्यामध्ये फिरतो आणि गँग बरोबर त्याचे संबंध..**

**सांगलीतील दुर्गादास वैदू दिलीप वैदू सुरेश वैदू कोल्हापूर मिरज मध्ये अनेकांचा घेतला बळी बोगस औषधांचा हा एक मोठी साखळी... अनेकांचा राग अनावर भर रस्त्यामध्ये या वैधूंचा लोक घेणार समाचार....**

खलनायक हा कर्नाटक जिल्ह्यातील असून राजेश गुराना उर्फ राकेश गुराणा शिर्के... काका पुतणे मनोज शिर्के या दोघांनी मोठ्या प्रमाणात संपूर्ण महाराष्ट्रात बनावट बोगस औषधी तयार केली आहेत यांची पालेमुळे नाशिक शिर्डी गुजरात या राज्यात देखील मोठ्या प्रमाणात आहे संगणमेर तालुक्यातील वडगाव पाणी येथे गडगे महाराजांना अटक करण्यात आली यामध्ये देखील या दोघांचा सहभाग असून या ठिकाणी या दोघांनी बोगस औषधे पुरवठा केला आहे यामधील पुरी नावाचा डॉक्टर अद्यापही पोलिसांना सापडला का नाही यांचे मोठे रॅकेट असून यांनी मोठ्या प्रमाणात अनेकांना खोटी बिले देऊन खोटी औषधे देऊन कॅन्सर यासारखे आजार बरे करतो असे कोट्यावधी रुपये घेऊन कर्नाटक जिल्ह्यातील या दोन नराधमाना अटक होणे व त्यांना फाशीची शिक्षा करावी अशी मागणी आता महाराष्ट्रातील मराठा संघटनांनी जोर धरले आहे अटक होणे ही गरजेचे आहे

या प्रकरणी पुढील तपास सुरू असून जप्त केलेल्या औषधांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत. दोषी आढळल्यास संबंधितांविरुद्ध औषध व सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले. तर सांगली मिरज कोल्हापूर या भागात देखील दुर्गादास वैदु सांगली दिलीप वैदू सुरेश वैदु यांचे दुकाने मोठ्या प्रमाणात थाटले आहे या दुकानांमधून बोगस औषधे किडनी व अनेक माणसांचे अवशेष काढण्याची देखील मोठे या ठिकाणी पहावयास मिळते अनेकांना कॅन्सर यासारखे आजार बरे होणार अशी असणारी टोळी दिवसभर अनेक हॉस्पिटल या ठिकाणी फिरत असतात तरी आता प्रशासनाने याकडे लक्ष घालावे यांचा बंदोबस्त होणे ही काळाची गरज आहे कर्नाटक राज्यातून महाराष्ट्रात येतात वैदू असल्याचा बनाव करतात राजेश उर्फ राकेश गोराणा व मनोज शिर्के यांनी आत्तापर्यंत अनेकांना फसवल्यामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल आहेत वेगवेगळ्या ठिकाणी बोगस आधार कार्ड काढतात बोगस दुकाने काढतात काही दिवसातच हे दुकाने कारवाई झाल्यानंतर बंद होतात अनेकांनी या ठिकाणी पोलीस यंत्रणेला अलर्ट दिला असला तरी पोलीस व शिर्के परिवाराचे ऋणानुबंध आहे गडगे या प्रकरणात देखील शिर्के नावाचा मोठा शिरकाव असून तुकाराम मुंडे यांनी या मनोज शिर्के राकेश शिर्के दुर्गादास वैदू सांगली दिलीप वैदू सुरेश वैदू यांना अटक करून यांनी मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील लोकांचा बळी घेतला आहे यांच्याकडे कोट्यावधी रुपयांच्या प्रॉपर्टी झाली कशी याची देखील सीबीआय सीआयडी ईडीची चौकशी होणे ही काळाची गरज आहे पुण्यातील कारवाईनंतर अनेकांनी पोहरा केला असला तरी काही दिवसानंतर ये महाशय पुन्हा वेगळ्या नावात वेगळ्या ठिकाणी दुकाने थाटतात यांच्यावर मकोकानुसार कारवाई होऊन त्यांना अटक करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे......

## एकोबा-तुकोबा-निळोबा च्या जयघोषात संत निळोबाराय पायीदिंडी पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**पिंपळनेर मध्ये भक्तीचा महासागर ..**

**टाळ,मृदंग आणि विठ्ठलनामाने दुमदुमले पिंपळनेर..**

अहिल्यानगर/दत्ता गाडगे (समर्थ गांवकरी)

या सोहळ्यास अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, महाराष्ट्र राज्य भाजपाच्या युवती प्रदेश अध्यक्ष संध्या सोनवणे,हभप पूरुंदवडेकर महाराज, हभप डॉ. विकासानंद मिसाळ महाराज,हभप कविराज महाराज झावरे, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर,तहसीलदार गायत्री सौंदाणे,पोलीस निरीक्षक संतोष खेडकर, बिडीओ सोनकुसळे, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, सुरेश पठारे,वसंत चेडे,जयशिंग मापारी,देवस्थान अध्यक्ष अशोक सावंत आणि संत निळोंबारायांचे वंशज व सोहळा प्रमुख गोपाळ काका मकाशीर, लक्ष्मण खामकर, चांगदेव शिर्के, भाऊसाहेब latamb ब बळे, महाराष्ट्राचे पत्रकार संघाचे







पहिले नगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडगे, प्रदेश कार्यकारणी सदस्य सुरेश खोसे, इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड तसेंच,जिल्हा प्रशासन, विविध मान्यवर, देवस्थानचे पदाधिकारी आणि राज्यभरातून आलेले लाखो वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भक्तिभावाच्या वातावरणात भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सवाचे आयोजन

**श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे भाविकांना उत्स्फूर्त सहभागाचे आवाहन**





अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

आषाढ शुद्ध द्वितीयेचे औचित्य साधत श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्री जगदीश रथयात्रा महोत्सव गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

शहरातील लालटाकी रोड येथील श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्ट येथून भगवान श्री जगदीश यांच्या रथयात्रेला प्रारंभ होणार असून, आकर्षक सजविलेल्या रथात विराजमान भगवान श्री जगदीशांचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. भजन, जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ही रथयात्रा संपन्न होणार आहे.

या पवित्र सोहळ्याचे यजमान श्री सत्यनारायणजी गोवर्धनजी झांवर हे असून, श्री खाकीदास बाबा (माहेश्वरी) मठ ट्रस्टचे अध्यक्ष तथा विश्वस्त दीपक काबरा यांनी सर्व समाजबांधव, नागरिक आणि भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून भगवान श्री जगदीश यांचे दर्शन घ्यावे व रथयात्रा महोत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन केले आहे.

आषाढ महिन्यातील या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघणार असून, भगवान श्री जगदीश यांच्या कृपाशीर्वादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शहापूर पंचायत समिती वर पाण्यासाठी ग्रामस्थांचा मोर्चा

**प्रशासन दुणाणले नागरिक संतापले...**

ठाणे/सुभाष विसे (समर्थ गांवकरी)

जिल्हा प्रतिनिधी/धरण आमच्या उशाला कोरड आमच्या घशाला', 'कोण म्हणतो देणार नाय घेतल्या शिवाय राहणार नाय' अशा घोषणांचा गजर करीत तालुक्यातील आवरे गावच्या महिलांनी आज पाण्यासाठी शहापुर पंचायत समितीवर धडक दिली. जलजीवन मिशन योजनेंतर्गत भातसा नदीवरून राबविण्यात आलेली पाणी योजना वीज जोडणी अभावी सुरू झाली नसल्याने पावसाळ्यातही पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने त्रस्त झालेल्या आवरे येथील महिलांनी आमरण उपोषणाचा इशारा देत पंचायत समितीसमोर ठिय्या मांडला. प्रशासनाने पंधरा दिवसात वीज जोडणीचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.


भातसा धरणाच्या पायथ्याशी असलेल्या आवरे गावासाठी जलजीवन मिशन योजनेंतर्गत भावली पाणी योजना राबविण्यात येत होती. मात्र निधी अभावी जलजीवन योजना ठप्प झाल्याने आवरे गावात पाणीटंचाई चे दुर्भिक्ष निर्माण झाले होते. ग्रामस्थांच्या मागणीनंतर भातसा नदीवरून पाणी योजना राबविण्यात आली मात्र योजना पूर्ण होऊनही गेल्या दोन वर्षांपासून वीज जोडणी रखडली होती. वीज जोडणी संदर्भात प्रशासनाचे वारंवार लक्ष वेधुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने अखेर आवरे गावातील महिलांनी आज शहापुर पंचायत समितीवर धडक दिली. पंचायत समितीच्या पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता विजया पांढरे यांनी वीज वितरण विभागाशी संपर्क साधून आवरे पाणी योजनेला वीज जोडणी संदर्भात महिती देऊन योग्य उपाययोजना करून देण्याबाबत सांगितले.



याबाबत उपअभियंता पांढरे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंधरा दिवसात वीज जोडणी करून देण्याचे स्पष्ट केले असल्याचे सांगितले. त्यानुसार वीज जोडणी नंतर योजना कार्यान्वयीत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर पाण्यावाचून त्रस्त झालेल्या आवरे येथील उपोषणकर्ते निवृत्ती पाटील, अशोक घरात व महिलांनी उपोषण मागे घेतले.

## संक्षिप्त

### विठूरायाची भेट अपूर्णच राहिली ! संत निवृत्तीनाथ महाराज पालखीतील महिलेचे निधन



**नाशिक** : एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात त्र्यंबकेश्वरहून सहभागी झालेल्या एका वृद्ध वारकरी महिलेचे आज (सोमवारी) पहाटे अहिल्यानगर येथे निधन झाले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे दुःखद निधन झाले. सुमनबाई मधुकर कांडेकर (वय ६५, सध्या रा. तळेगाव अंजनेरी, ता. त्र्यंबकेश्वर) असे या मृत वारकरी माऊलीचे नाव आहे. विठुरायाच्या भेटीआधीच मरण पदराशी आल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. नेमकं काय घडलं ?

मिळालेल्या माहितीनुसार, संत निवृत्तीनाथ महाराज दिंडी सोहळा सध्या अहिल्यानगर जिल्ह्यात मार्गक्रमण करत आहे. या वारीत त्र्यंबकेश्वरहून सुमनबाई मधुकर कांडेकर या सहभागी झाल्या होत्या.

### चीनमध्ये नाशिकच्या श्रावणीची सुवर्ण झेप; आशियाई स्पर्धेत दोन सुवर्ण, एक कांस्य जिंकत रचला इतिहास



**नाशिक** : नाशिकच्या क्रीडाक्षेत्रासाठी अभिमानाची बातमी आहे. आज प्रत्येक नाशिककर अभिमानाने श्रावणी सांगळे हिचे नाव घेत आहे, आणि त्याला कारणही तसंच आहे. चीनमध्ये आयोजित पहिल्या आशियाई २३ वर्षांखालील थलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत नाशिकच्या श्रावणी सांगळेने आपल्या दमदार कामगिरीने इतिहास रचला आहे. दोन सुवर्ण आणि एक कांस्य अशा तब्बल तीन पदकांची कमाई करत श्रावणीने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशाचे नाव उज्वल केले आहे. तिच्या या ऐतिहासिक यशामुळे नाशिकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### गोरेगाव-मुलुंड लिंक रोडचा पहिला उड्डाणपूल सप्टेंबरमध्ये वाहतुकीसाठी खुला होणार

**मुंबई :** मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या गोरेगाव–मुलुंड लिंक रोड प्रकल्पातील पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, दिंडोशी कोर्ट ते गोरेगाव फिल्मसिटीदरम्यानचा उड्डाणपूल सप्टेंबर २०२६ मध्ये वाहतुकीसाठी खुला होणार आहे. हा उड्डाणपूल सुमारे १.२ किलोमीटर लांबीचा असून, पश्चिम द्रुतगती महामार्गालगतच्या दिंडोशी कोर्टापासून सुरू होऊन संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ संपतो. उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर पश्चिम उपनगरातील वाहनचालकांना वाहतुकीसाठी आणखी एक पर्यायी मार्ग उपलब्ध होणार असून, पश्चिम द्रुतगती महामार्गावरील ताण कमी होण्यास मदत होईल.

### गर्दीच्या वेळी एसी लोकलचा एसी बंद; मुलुंड स्थानकावर १५ मिनिटे खोळंबा, प्रवासी गुदमरून बेशुद्ध

**मुंबई** : मुंबईतील मध्य रेल्वे मार्गावर सकाळच्या ऐन गर्दीच्या वेळी एसी लोकलमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. टिटवाळा येथून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणारी एसी लोकल मुलुंड स्थानकात सुमारे १५ मिनिटे उभी राहिली. याच दरम्यान लोकलमधील एसी यंत्रणा अचानक बंद पडल्याने डब्यात प्रचंड उकाडा निर्माण झाला आणि अनेक प्रवाशांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. काही वेळातच तीन ते चार प्रवासी गुदमरल्यामुळे बेशुद्ध पडल्याने स्थानकावर एकच खळबळ उडाली.

# दारूमुक्त लिंगदेवचा निर्धार! महिलांच्या अश्रूंनी हादरली सभा;

## अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांचा एल्गार, दारूबंदी समितीची स्थापना

**अकोले (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांनी एकजूट दाखवत दारूमुक्त गावाच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलले. गावातून अवैध दारूविक्री कायमस्वरूपी हद्दपार करण्याच्या उद्देशाने आयोजित दारूबंदी बैठकीत ग्राम स्थ, महिला भगिनी, युवक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत दारूबंदी समितीची स्थापना करण्यात आली. बैठकीत दारूमुक्त लिंगदेव – व्यसनमुक्त समाज हा संकल्प सर्वांनी एकमुखाने स्वीकारत कायदेशीर आणि लोकसहभागातून अवैध दारूविक्रीविरोधात निर्णायक लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीत दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी यांनी व्यसनमुक्त समाज ही काळाची गरज असल्याचे सांगत प्रत्येक गावाने दारूबंदी चळवळ लोकचळवळ बनवावी, असे आवाहन केले. ज्यांना चांगल्या कामाचे श्रेय घ्यायचे आहे त्यांनी वाईट कामांची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. ग्रामपंचायत सदस्यांना ग्राम सभेलाच उपस्थित राहता येत नसेल, तर त्यांनी पदाचा पुनर्विचार करावा, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

दारूबंदी जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रा. मच्छिंद्र देशमुख यांनी दारूमुळे उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांची उदाहरणे देत, देवकार्य आणि विधायक कामांसाठी दारू विक्रेत्यांचा पैसा चालतो, ही समाजाची शोकांतिका आहे. दारूमुळे महिलांच्या डोळ्यांत येणारे अश्रू पुसणार कोण? असा परखड सवाल उपस्थित केला.

बैठकीतील सर्वात भावनिक क्षण म्हणजे आदिवासी ठाकर समाजातील महिलांनी मांडलेल्या वेदना. घरातील पुरुष दारूच्या आहारी गेल्यामुळे संसार उद्ध्वस्त होत असल्याचे सांगताना अनेक महिलांना अश्रू अनावर झाले. दिवसभर मजुरी करूनही रात्री मुलांना पोटभर जेवण देता येत नाही. नवरा आणि मुलगा दारू पिऊन घरी येतात. कष्टाने कमावलेला पैसा दारूत उडतो. काम करणाऱ्या महिलांच्या गळ्यात साधा फुटका मणीही नाही, अशा शब्दांत त्यांनी आपल्या वेदना व्यक्त केल्या.

एका महिलेने सांगितले की, दारूच्या नशेत तिच्या कुटुंबातील व्यक्तीने सुमारे ८० हजार रुपयांची दुचाकी फोडली, त्यामुळे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे. काही महिलांनी भावनिक स्वरात सांगितले की, अवैध दारूविक्री बंद झाली नाही तर आमचे जगणे असह्य झाले आहे. त्यांच्या व्यथा ऐकून सभागृहातील वातावरण क्षणभर स्तब्ध झाले. अनेक ग्रामस्थांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

यावेळी लता गावडे, नंदा कातोरे, मंगल कातोरे, गीता कातोरे, प्रदीप हासे, प्रा. मच्छिंद्र देशमुख, विमल मुंढे, कल्पना फापाळे, प्रभाकर फापाळे, बाळासाहेब कानवडे आणि अमित घोमल यांनी मनोगत व्यक्त केले.

शिवसेना नेते प्रभाकर फापाळे यांनी सांगितले, सन १९९२ मध्ये मी सरपंच असताना ह.भ.प. वाबळे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली लिंगदेवमधील परवानाधारक दारूचे दुकान बंद करण्यात आले होते. त्यावेळी ते शक्य झाले, तर आज अवैध दारूविक्री का बंद होऊ शकत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

प्रदीप हासे यांनी, मी माझ्या गावातील दारू बंद करू शकतो, तर लिंगदेवमध्येही ते शक्य आहे. अवैध दारूविक्री करणाऱ्यांना समाजाने पाठबळ न देता सामाजिक बहिष्कार घालण्याची वेळ आली आहे, असे मत व्यक्त केले.

विमल मुंढे यांनी महिलांना धीर देत, महिला संवेदनशील असतात. त्या सहज दुःख व्यक्त करत नाहीत; मात्र अन्यायाचा कळस गाठला की क्रांती




घडते. घाबरू नका, मी अन्यायाविरुद्ध नेहमी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहीन, असे आश्वासन दिले.

लिंगदेवचे सरपंच अमित घोमल यांनी, मी कायम दारूबंदीच्या बाजूने आहे. मात्र मटका, जुगार आणि 'सोल्युशन'सारख्या नव्या व्यसनांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे, असे सांगत अलीकडे अशा प्रकरणात काही युवकांना पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती दिली.

लिंगदेव ग्रामपंचायत सदस्या कल्पना फापाळे यांनी, महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध मी कायम उभी राहीन. माझे गाव व महिला भगिनी सुखी, सुरक्षित आणि व्यसनमुक्त व्हावे, यासाठी वाटेल ती किंमत मोजण्याची तयारी आहे, असे त्य्यानी सांगितले. पत्रकार बाळासाहेब कानवडे यांनी महिलांच्या व्यथा अत्यंत वेदनादायी असल्याचे सांगितले, तर जालिंदर कानवडे यांनी नुसत्या बैठका घेऊन उपयोग नाही; आता ठोस कृतीची वेळ आली आहे. निवडणुकीत दारू वाटणाऱ्यांना जनतेने धडा शिकवला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

बैठकीत बीट अंमलदार, पोलीस पाटील आणि ग्रामसेवक यांनी अवैध दारूविक्री रोखण्यासाठी अधिक जबाबदारीने काम करावे, तसेच संबंधित यंत्रणांनी तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

या बैठकीस दारूबंदी चळवळीचे प्रणेते हेरंब कुलकर्णी, दारूबंदी जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रा. मच्छिंद्र देशमुख, अकोले तालुका दारूबंदी चळवळ सदस्य प्रदीप हासे, ह.भ.प. शांताराम महाराज पापळ, रेडे ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच प्रशांत बंदावणे, लिंगदेव ग्रामपंचायतीचे सरपंच अमित घोमल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी विधानसभा अध्यक्ष विमल मुंढे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक कार्याध्यक्ष हरिभाऊ फापाळे, ग्रामपंचायत सदस्य कल्पना फापाळे, कामगार पोलीस पाटील मंगल पवार, ज्ञानगंगा वाचनालय अध्यक्ष सदाशिव कानवडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख प्रभाकर फापाळे, पत्रकार बाळासाहेब कानवडे, गोपीनाथ हाडवळे, सुदाम हांडे, यमनाजी कानवडे, अशोक कोरडे, गणेश फापाळे, जालिंदर कानवडे, भाऊ कानवडे, महेश फापाळे, बाबुराव कोरडे, कारभारी जाधव गुरुजी, लता गावडे, नंदा कातोरे, मंगल कातोरे, गीता कातोरे, मंगल आढाव यांच्यासह महिला–पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बैठकीचे सूत्रसंचालन हरिभाऊ फापाळे यांनी केले, तर गोपीनाथ हाडवळे यांनी आभार मानले.**

बैठकीच्या शेवटी सर्व उपस्थितांनी हात वर करून दारूमुक्त लिंगदेव – व्यसनमुक्त समाज हा संकल्प पुन्हा उच्चारला. अवैध दारूविक्रीविरोधात जनजागृती, प्रशासनाशी समन्वय आणि कायदेशीर लढा सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार करण्यात आला. लिंगदेवमध्ये पेटलेली ही दारूबंदीची मशाल आता संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.श्री.हरिभाऊ फापाळे ९३७१८०६०८३

# ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

भूमिपुत्र शेतकरी विकास मंडळाचे अध्यक्ष तथा ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीगोंदा तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप तसेच वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना साखरेचे वितरण करून समाजाप्रती असलेली बांधिलकी जपण्यात आली.

हिरडगाव येथील गौरी शुगर येथे आयोजित रक्तदान शिबिराला नागरिक व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.

याचबरोबर घुगलवडगाव येथील महामानव बाबा आमटे वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना साखरेचे वाटप करण्यात आले. तसेच विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वितरण करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले. ढवळगाव येथेही विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची भेट देण्यात आली.

या उपक्रमांमध्ये गौरी शुगरच्या संचालिका सुरेखा बोत्रे पाटील, गौरी बोत्रे पाटील तसेच व्यवस्थापक रोहीदास यादव यांच्या हस्ते साहित्य व साखर वाटप करण्यात आले. उपस्थितांनी बाबुराव बोत्रे पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. आवश्यक असल्यास या बातमीत उपस्थित मान्यवरांची नावे, रक्तदात्यांची संख्या किंवा इतर तपशीलही समाविष्ट करून अधिक सविस्तर वृत्त तयार करता येईल.



# कल्याणातील प्रसिद्ध व्यावसायिक प्रकाश मुथा यांचा मुलगा अविनाश मुथा याला अटक

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

कल्याणातील प्रसिद्ध ज्वेलर्स, बिल्डर आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व प्रकाश मुथा यांचा मुलगा अविनाश मुथा याला एका भीषण अपघातप्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी अटक केली आहे. अपघातात वापरण्यात आलेली MH 05 EJ 4041 क्रमांकाची कारही पोलिसांनी जप्त केली आहे.

ही घटना सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास बिर्ला गेट येथील कमल लॉजसमोर घडली. म्हारळ गावातील रहिवासी देवेंद्रसिंह राजपूत (वय ५१) हे आपल्या मुलगा संजय राजपूत यांच्या चH 05 DL 6085 क्रमांकाच्या स्कूटरवरून म्हारळहून शहाडकडे जात होते. त्यावेळी अविनाश मुथा यांच्या कारने त्यांच्या स्कूटरला जोरदार धडक दिली.

या भीषण धडकेत देवेंद्रसिंह राजपूत गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत उल्हासनगर पोलिसांनी अविनाश मुथा याला अटक केली असून अपघातग्रस्त कार जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# छत्री, हरिपाठ व मिष्टान्न वाटपातून वारकऱ्यांची सेवा

## रामेश्वर दिंडीचा वारकऱ्यांना मराठी पत्रकार संघटनेचा आधार

**धांदरफळ ते पंढरपूर दिंडीच्या वारकऱ्यांची राहुरीत स्वागत.. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने वारकऱ्यांना छत्री हरीपाठ महाप्रसादाचे वाटप. पत्रकार संघाच्या कार्याचे जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे यांच्याकडून कौतुक**







**राहुरी (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने वारकऱ्यांना छत्री, हरिपाठ व मिष्ठान्नाचे वाटप करून भक्तसेवेचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. घटनेचे राज्याध्यक्ष विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे तसेच मनोज साळवे यांच्या हस्ते हा सेवा उपक्रम पार पडला. यावेळी...महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका परिघा आरोटे सोनेरी विश्वास आरोटे छत्रपती विश्वास आरोटे...आदि उपस्थित होते या उपक्रमामुळे दिंडीतील वारकऱ्यांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

राहुरी फॅक्टरी हद्दीतील घुले वस्ती येथे वारकऱ्यांचा मुक्काम असलेल्या ठिकाणी जाऊन मराठी पत्रकार संघटनेने हा स्तुत्य उपक्रम राबवला.

श्री क्षेत्र रामेश्वर अधिष्ठीत पंचक्रोशी वारकरी पायी दिंडी सोहळ्याचे २३ वे वर्ष यंदा मोठ्या भक्तिभावात साजरे करण्यात आले. श्री क्षेत्र रामेश्वर (धांदरफळ बु||, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथून श्री संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याबरोबर श्री क्षेत्र पंढरपूरकडे दिंडीचे प्रस्थान करण्यात आली होती या दिंडीचे राहुरी फॅक्टरी येथे मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने पावसाचा आधार म्हणून छत्री, हरिपाठ व मिष्ठांन वारकऱ्यांना देण्यात आले.संगमनेर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य इंजी रामहरी कातोरे यांनी या सेवाभावी उपक्रमाचे विशेष कौतुक केले. वारकरी पंढरपूरकडे माऊलीच्या दर्शनासाठी जात असताना पावसाळ्यात त्यांच्या संरक्षणासाठी छत्री वाटप करणे हा अत्यंत उपयुक्त आणि समाजहिताचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार हा समाजातील चांगल्या–वाईट प्रत्येक परिस्थितीत जनतेच्या मदतीसाठी धावून जाणारा महत्त्वाचा घटक असून, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या कार्याचे त्यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व वारकरी बंधू–भगिनींना पंढरपूर यात्रेसाठी शुभेच्छाही दिल्या.

दिंडी प्रस्थानापूर्वी सकाळी ६.०० वाजता मा. श्री. अनिलराव प्रतापराव देशमुख (माजी सभापती, कृ.उ.बा.स. संगम नेर) यांच्या शुभहस्ते श्री भगवान रामेश्वरास अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भक्तिमय वातावरणात टाळ–मृदंगाच्या गजरात दिंडी मार्गस्थ झाली.

या दिंडीचे मार्गदर्शन ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे (अध्यक्ष, संगमनेर तालुका वारकरी संघटना) यांनी केले असून वारकरी परंपरेचा वारसा जपत भक्ती, नामस्मरण आणि समाजप्रबोधनाचा संदेश देत दिंडी पुढे सरकत आहे.

या प्रसंगी मा. ॲड. माधवराव कानवडे (व्हा. चेअरमन, ए.डी.सी.सी. बँक, अहिल्यानगर), मा. संपतराव विष्णु डोंगरे (चेअरमन, शेतकी संघ, संगमनेर), मा. पांडुशेठ दामोदर घुले (व्हा. चेअरमन, स.म.भा.थो.स.का., संगमनेर) तसेच मा. रोहिदास गेनुजी डेरे (खजिनदार, अगस्ती आश्रम ट्रस्ट, आळंदी) यांनी शुभेच्छा देत दिंडीस प्रोत्साहन दिले.

भक्तिभाव, परंपरा आणि समाजएकतेचा संदेश देणारा हा दिंडी सोहळा वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेचा जिवंत वारसा असल्याचे यावेळी भाविकांनी व्यक्त केले. यावेळी डॉ विश्वास आरोटे परिघा आरोटे पत्रकार अनिल कोळसे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम घेतल्याने वारकऱ्यांनी संघटनेचे आभार मानले व पदाधिकाऱ्यांचा यथोचित सन्मान केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### श्री शिव छत्रपतीच्या विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड




जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)

श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर येथील कनिष्ठ महाविद्याल यातील मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रातील दिपक मारुती बगाड व संस्कृत गणेश रसाळ या दोन विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात अग्नीवीर म्हणून निवड झाली आहे.त्यांनी नुकतेच आपले ट्रेनिंग पूर्ण केले आहे.दिपक बगाड ची नियुक्ती उत्तर प्रदेश येथे व संस्कृत रसाळची नियुक्ती पंजाब येथे झाली आहे. लवकरच हे विद्यार्थी देश सेवेच्या कार्यासाठी रुजू होणार आहेत. संस्थेच्या,महाविद्यालयाच्या वतीने या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.त्यावेळीमनोगत व्यक्त करताना महाविद्यालयातील मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्राचा खूप फायदा झाला,आम्हांला त्यामुळेच हे यश मिळवता आले असे या विद्यार्थ्यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय शिवाजीराव काळे यांनी या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्याअध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी. कुलकर्णी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.बी.वाघ- मरे उपप्राचार्य डॉ.आर.डी. चौधरी,उपप्राचार्या व समन्वयक प्रा पी.एस.लोढा,पर्यवेक्षक प्रा. एस.ए.श्रीमंते,एमसीव्हीसी विभाग प्रमुख प्रा.के.जी.नेटके, कला विभाग प्रमुख प्रा आर. एस.कांबळे,सायन्स जेईई व नीट परीक्षा विभाग प्रमुख प्रा.सी.बी.कांबळे,मोफतपोलीस भरती प्रशिक्षण विभागाच्या चेअरमन प्रा.एम.डी हाडवळे व इतर सर्व प्राध्यापकां नी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील देश सेवेच्या कार्या साठी शुभेच्छा दिल्या.

### ब्रिटानिया न्यूट्रिशन फाउंडेशनच्या मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत श्री व्यंकनाथ विद्यालयाचे विजेतेपद



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे ब्रिटानिया न्यूट्रिशन फाउंडेशनच्या वतीने मुलींसाठी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत तालुक्यातील एकूण चार शाळांनी सहभाग नोंदविला.

अत्यंत चुरशीच्या सामन्यांनंतर श्री व्यंकनाथ विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट खेळामुळे विद्यालयाच्या नावलौकिकात आणखी भर पडली.

स्पर्धेतील विजयी संघाचे संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, स्कूल कमिटीचे अध्यक्ष डी. आर. (आबा) काकडे, सदस्य विलासराव काकडे, पुरुषोत्तम बापू लगड, अकबरभाई इनामदार तसेच स्कूल कमिटीच्या सर्व सदस्यांनी आणि शाळेचे प्राचार्य जठार सर यांनी अभिनंदन केले.

विजेत्या संघाला संदेश झेंडे व अभिषेक उदमले यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

### पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांचा सातत्यपूर्ण उपक्रम; ठाकरवाडी (विठे) शाळेत वृक्षारोपण



अकोले (समर्थ गांवकरी)

पर्यावरण संवर्धनाचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी (विठे) येथे पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण कार्यक्रम झाला.

यावेळी मुख्याध्यापक बोऱ्हाडे सर, बांडे सर, नाडेकर सर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या हस्ते आंबा, पेरू, चिकू तसेच विविध फुलझाडांची रोपे लावण्यात आली. प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. राहुल राऊत यांच्या झाडे लावा - झाडे जगवा अभियानांतर्गत आतापर्यंत अकोले तालुक्यातील २० शाळांमध्ये वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात आले असून, ६५० हून अधिक झाडे शाळांना विनामूल्य देण्यात आली आहेत. लहानपणापासून पर्यावरणप्रेमाचे संस्कार रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे राहुल राऊत यांनी सांगितले.

# ‘वारकरी सेवेतून मानवतेचा वसा’ समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल तर्फे मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप

जुन्नर तालुका/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)

वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवाया उदात्त भावने तून समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर बेल्हे,यांच्या वतीने चैतन्य महाराज ओतूर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्या निमित्त राजूरी येथे वारकऱ्यां साठी मोफत आरोग्य तपासणी मोफत औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमाला वारकऱ्यांचाउत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.पायी वारी दरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक थकवा,सांधेदुखी, पायदुखी,सर्दी,ताप,रक्तदाब तसेच इतर किरकोळ आजारां ची तज्ज्ञ डॉक्टरांकडूनतपासणी करण्यात आली.

आवश्यकतेनुसार आयुर्वेदिक औषधांचे मोफत वितरण करून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या सेवा भावी उपक्रमामुळे वारकऱ्यांनी समाधान व्यक्त करत समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटलच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.

या उपक्रमाचे नियोजन समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे प्राचार्य डॉ.संजय लोंढे,डॉ.रमेश पाडेकर,डॉ. मधुसूदन कुऱ्हाडे,डॉ. रश्मी चव्हाण,डॉ.श्रवंती तोडचिरकर, डॉ.जयश्री मते,डॉ. कृतिका कांबळे,डॉ.स्नेहल गायकवाड तसेच प्रा.मानसी गवळी,यशवंत फापाळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.या सेवाभावी उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या स्नेहलशेळके,कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत,प्राचार्य डॉ.संजय लोंढे तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर यांनी आयोजकांचे अभिनंदन करत समाजहितासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.




समर्थ आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने वारकरी संप्रदायाच्या सेवेतून सामाजिक उत्तरदायित्वाचा आदर्श निर्माण करत ‘सेवा,संस्कार व समर्पण’ या मूल्यांचा प्रत्यय पुन्हा एकदा समाजाला करून दिला.

# शिवनेरी किल्ल्याची सरंक्षक तटबंदीची पडझड

जुन्नर/रविंद्र भोर (समर्थ गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्म ठिकाण म्हणून प्रसिद्ध जुन्नर येथील किल्ले शिवनेरी भोवतीअतिक्रमण होऊ नये म्हणून कोट्यवधी रुपये खर्च करून नव्यानेच बांधलेल्या संरक्षक भिंतीचे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून भिंतीच्या बांधकामासाठी वापरले दगड वाहून गेले आहेत.




जुलै महिन्यात चार दिवसात झालेल्या तुफान पावसात गडावरून आलेल्या पावसाच्या पाण्याचे लोट आदळून चार ते पाच ठिकाणी संरक्षक भिंत कोसळून पडली आहे.कॉंक्रिटमध्ये बांधलेल्या मोऱ्याही वाहून गेल्या आहेत. गडाच्या पूर्वेला जुन्नर शहर व बारव भागाकडील बाजूची संरक्षक भिंत;तसेच कडेलोटा कडे जाणाऱ्या भागात पायथ्याशी असलेल्या भिंतीचीही मोठ्या प्रमाणावर पडझड झाली आहे.

या शिवाय किल्ल्याच्या पायथ्याशी आणि कुंपणाच्या बाहेरून जे दिवे लावले आहेत त्यातील अनेक दिवे बंद झाले आहेत तर अनेक दिवे समाज कंटकांनी फोडले असून पुरातत्व खात्याने,वनविभागाने,तसेच जुन्नर नगर पालिकेने यात लक्ष घालून संवर्धन करावे अशी मागणी दुर्गप्रेमींनी केली आहे.

# उज्वल भविष्यासाठी गरूड झेप महत्वाची : प्रा.डॉ.राजेंद्र लड्डा

संगमनेर (समर्थ गांवकरी)

मिळविलेल्या ज्ञानाच्या आधारे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करा. पण हे करत असतांना तुमची गरूड झेप महत्वाची असल्याचे मत शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर चे नवनिर्वाचीत सचिव प्रा.डॉ.राजेंद्र लड्डा यांनी व्यक्त केले.

महेश सत्संग मंडळ, संगमनेर आयोजीत सत्कार समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपिठावर माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत (बाळासाहेब) कासट, संगमनेर माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष संजय आर. मालपाणी, महेश सत्संग मंडळाचे अध्यक्ष सतीश लाहोटी हे उपस्थित होते.

प्रा.डॉ.लड्डा पुढे म्हणाले कि, मुर्तीकार ज्याप्रमाणे दगडातुन सुंदर मुर्तीला घडवितो, त्याप्रमाणे तुमचा मुर्तीकार चांगला पाहिजे. म्हणजेच सकारात्मक विचारांच्या समुहासह रहा, त्यांच्या विचारांचे आचरण करून भविष्य घडवा. तुम्हाला स्वारस्य असलेल्या क्षेत्रात पूर्णपणे झोकुन काम केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले यश मिळुन भविष्य उज्वल होईल असेही ते म्हणाले.



यावेळी १० वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले श्लोक कासट, समृद्धी भुतडा, अनय चांडक, युग भंडारी, आदिती सोमाणी, स्वरूप सोमाणी, हृदया सोमाणी, देवश्री लाहोटी, श्लोक बाहेती, पलक मणियार, १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आदित्य भुतडा, दीप पडतानी, अनुष्का चांडक, पार्थ अट्टल, हर्ष बुब, अवनी कासट, नेटबॉल मध्ये नावलौकीक प्राप्त केलेली नंदिनी मुंदडा, यांचेसह भारताच्या ५० यशस्वी उद्योजकामध्ये सन्मानित झालेला इमॅजीका वल्ड चे व्यवस्थापकीय संचालक जय मालपाणी, जेईई ॲडव्हान्स मध्ये विशेष यश संपादन केलेली राशी बाहेती, कतार (सौदी अरेबिया) च्या एअरलाईन्स मध्ये पायलट म्हणून नियुक्त झालेला स्वप्निल बाहेती, बी फार्म मध्ये रॅकींग मध्ये आलेला राजतिलक लड्डा, मास्टर इन फिजीओथेरपी प्रिती आसावा, एमबीबीएस मास्टर इन पीजी ची डॉ. साक्षी चांडक, बी.टेक यश भुतडा तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संचालक श्रीनिवास भंडारी, अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी सभेचे कोषाध्यक्ष कुशावर्त कासट, संगठन मंत्री हरिकिसन चांडक, प्रशासकीय समिती सदस्य प्रकाश कलंत्री यांना देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्तविक महेश सत्संग मंडळाचे अध्यक्ष सतीश लाहोटी यांनी केले. तर सुत्रसंचालन करून पाहुण्यांचा परिचय प्रा. सचिन बाहेती यांनी करून दिला. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष सतीश लाहोटी, सचिव आशिष राठी, ज्येष्ठ सदस्य बसंतकाका मणियार व त्यांच्या सर्व सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत श्रीगोंदा कन्या विद्यालयाची उल्लेखनीय कामगिरी

### पाचवीत उत्तर विभागात द्वितीय, आठवीत तृतीय क्रमांक; राज्य गुणवत्ता यादीत स्वरांजली भगत १४ वी

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाने उत्तर विभागात इयत्ता पाचवीमध्ये द्वितीय, तर इयत्ता आठवीमध्ये तृतीय क्रमांक पटकावत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली.

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेस १०४ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या. त्यापैकी १३ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक ठरल्या, तर ६९ विद्यार्थिनी पात्र ठरल्या. विद्यालयाचा निकाल ६६.३३ टक्के लागला.

शिष्यवृत्तीधारक विद्यार्थिनींमध्ये भूमी दादा साळुंके (२४६), सान्वी सुधीर साबळे (२३८), सृष्टी काकासाहेब खोसे (२२४), श्रावणी उद्धव दिंडे (२२२), आरोही शरद तरटे (२२०), वैष्णवी रमेश हराळ (२२०), अनन्या चंद्रशेखर उदार (२१८), वृंदावणी पद्माकर गिरमकर (२१०), शुभ्रा हंबीर म्हस्के (२०८), प्राची अजित बोरुडे (२०६), सलिहा जुबेर पठाण (२०६), वेदिका गणेश शेंडगे (२०६) आणि अनन्या प्रसाद शिंदे (२०४) यांचा समावेश आहे.

या विद्यार्थिनींना मराठी विषयासाठी श्रीमती एस. डी. राऊत, गणितासाठी विभागप्रमुख श्रीमती एस. व्ही. वाघचौरे, इंग्रजीसाठी श्रीमती पी. बी. घोडे आणि बुद्धिमत्ता विषयासाठी श्री. एस. जी. गारुडकर यांनी मार्गदर्शन केले.

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयानेही उल्लेखनीय यश मिळवले. स्वरांजली संदीप भगत हिने २७४ गुणांसह राज्य गुणवत्ता यादीत १४ वा क्रमांक पटकावला. तसेच समृद्धी सचिन शेळके (२६८), नीता नितीन सप्रे (२६४), श्राव्या मच्छिंद्रनाथ लोखंडे (२६२), मयुरी लहू गांगर्डे (२६०), प्राची महेश खोत (२५४), आराध्या अमोल गांगर्डे (२५२), भार्गवी योगेश शेलार (२५२), समीक्षा संतोष शिंदे (२४८), तनिष्का संदीप राऊत (२३२), समीक्षा संतोष टकले (२२८), स्पंदन विजय वांगणे (२२६) आणि परिनीती विक्रम वाघ (२२४) या विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक ठरल्या.

आठवीच्या विद्यार्थिनींना मराठीसाठी श्री. के. डी. शिंदे, गणितासाठी विभागप्रमुख श्री. के. जी. खामकर, इंग्रजीसाठी श्री. डी. सी. खेडकर आणि बुद्धिमत्ता विषयासाठी श्रीमती एस. एस. कळसकर यांनी मार्गदर्शन केले.

यशस्वी विद्यार्थिनींचा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य कुंडलिकराव दरेकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडके, स्कूल कमिटी सदस्य ज्योत्स्ना भंडारी, अश्विनी रणशिंग, प्राचार्य दिलीपराव भुजबळ, मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, गुरुकुल प्रमुख किरण शिंदे तसेच संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी अभिनंदन करून कौतुक केले.

# वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प; ‘एक विद्यार्थी - एक झाड’ उपक्रमातून वर्षभर निगेची जबाबदारी

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित सोनिया गांधी पॉलिटेक्निक, श्रीगोंदा आणि सकाळ यिन यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. ’एक विद्यार्थी - एक झाड’ हा अभिनव संकल्प प्रत्यक्षात राबवत प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावून त्याची वर्षभर निगा राखण्याची जबाबदारी स्वीकारली. या उपक्रमांतर्गत सुमारे १,००० विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे वितरित करण्यात आली.




कार्यक्रमास ज्ञानदीप ग्रामीण विकास संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे ऑडिटर भापकर सर, निरीक्षक एस. पी. गोलांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. नागवडे तसेच सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी पर्यावरण संवर्धन ही केवळ एका दिवसापुरती मोहीम नसून प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. वृक्षारोपणानंतर झाडांचे संगोपन आणि संवर्धन करणे हेच खरे पर्यावरण संरक्षण असल्याचा संदेश बी. के. लगड यांनी दिला.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला लावलेल्या झाडाची संपूर्ण वर्षभर काळजी घेण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी दर महिन्याला आपल्या झाडाचा फोटो काढून त्याची वाढ, देखभाल आणि स्थितीची नोंद करायची असून संबंधित शिक्षक त्याचा नियमित आढावा घेणार आहेत. झाडांची योग्य निगा राखली जात आहे की नाही, यावर सातत्याने लक्ष ठेवले जाणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. ए. बी. नागवडे यांनी प्रस्ताविकात दिली.

याशिवाय महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही प्रत्येकी एक झाड लावून त्याची निगा राखण्याचा संकल्प केला. त्यामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण महाविद्यालयाचा पर्यावरणपूरक उपक्रम ठरणार आहे.

वर्षअखेरीस प्रत्येक झाडाचे जिओ-टॅगिंग करून त्याचा अंतिम आढावा घेतला जाणार आहे. झाडाची वाढ, नियमित देखभाल आणि पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्याचा पारितोषिक देऊन गौरव करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जबाबदारीची भावना, वृक्षसंवर्धनाची सवय आणि सामाजिक उत्तरदायित्व अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी



# जयहिंद लोकचळवळीच्या राज्यस्तरीय युवा शेतकरी सन्मान सोहळ्यात राज्यभरातील कर्तृत्ववान शेतकऱ्यांचा गौरव

## शेतीला सक्षम केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न साकार होणार नाही : लोकनेते बाळासाहेब थोरात

## शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासनाची व्यापक तयारी : मंत्री जयकुमार रावल




नाशिक/संगमनेर (समर्थ गांवकरी)

**जयहिंद लोकचळवळीच्या कृषी विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय युवा शेतकरी सन्मान सोहळा २०२६' उत्साहात पार पडला. नाशिक येथे झालेल्या या सोहळ्यात राज्यभरातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. हरितक्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे यंदा दहावे वर्ष होते.**

लोकनेते बाळासाहेब थोरात आणि जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार सत्यजीत तांबे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येतो. कार्यक्रमाला राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे, सह्याद्री फार्म्सचे संस्थापक विलास अण्णा शिंदे, आमदार मनोज कायंदे, जय हिंद महिला मंचच्या अध्यक्षा दुर्गाताई तांबे, प्रवीण जाधव, नामदेवराव गुंजाळ, प्रा. सुनील बच्छाव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ.सुधीर तांबे यांनी जयहिंद लोकचळवळीच्या २८ वर्षांच्या कार्याचा आढावा घेत, शेती, शिक्षण, आरोग्य, युवक आणि महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून सुदृढ समाज उभारण्याचा चळवळीचा संकल्प असल्याचे सांगितले. कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढ, समूहशेती, इंटिग्रेटेड फार्मिंग, चांगल्या कृषी पद्धती आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेती अधिक फायदेशीर करण्याची गरज त्यांनी मांडली. पुरस्कार विजेते शेतकरी हे इतरांसाठी प्रेरणास्थान बनून आपले अनुभव गावागावात पोहोचवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

### शेती बळकट झाली तरच विकसित भारताचे स्वप्न साकार होईल : लोकनेते बाळासाहेब थोरात

अध्यक्षीय भाषणात लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी हरितक्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक, यशवंतराव चव्हाण आणि अण्णासाहेब शिंदे यांच्या योगदानाचे स्मरण करत, देशाच्या प्रगतीचा पाया हा शेतीत असल्याचे अधोरेखित केले. हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता आणि विक्री व्यवस्थेतील अडचणी ही शेतीसमोरील प्रमुख आव्हाने असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी केलेले यशस्वी प्रयोग कृषी विद्यापीठांनी अभ्यासून राज्यभर पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सह्याद्री फार्म्ससारखी शेतकरी उत्पादक कंपन्यांची यशस्वी मॉडेल्स ग्रामीण भागात उभी राहिली तर शेतीला नवी दिशा मिळेल, असे ते म्हणाले. समूहशेती, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन आणि सक्षम पणन व्यवस्था यांशिवाय शेतीचा विकास शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांचा सन्मान हा केवळ पुरस्कारापुरता न राहता त्यांच्या कार्यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळाली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### उत्पादनाबरोबरच प्रक्रिया, निर्यात आणि बाजारपेठेवरही भर द्यावा : मंत्री जयकुमार रावल

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा, कोल्ड चेन, डिजिटल कृषी व्यवस्था आणि महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी शासन सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी केवळ उत्पादनावर न थांबता प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग, साठवणूक आणि निर्यातक्षम शेतीकडे वळण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नाशिक परिसरात जागतिक दर्जाची कृषी बाजारपेठ उभारण्याचे नियोजन सुरू असून, त्यातून शेतमालाच्या विक्रीसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

तसेच जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'MGNET' (Maharashtra gribusiness Network Project) प्रकल्पाच्या माध्यमातून कृषी प्रक्रिया उद्योग आणि मूल्यवर्धनाला चालना दिली जात असून, शेतकरी आणि कृषी उद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. खासदार भास्कर भगरे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शेतीत वेगळे प्रयोग करणाऱ्या युवा शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

सह्याद्री फार्म्सचे मॉडेल राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, उत्पादनाबरोबर प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग आणि बाजारपेठेचे नियोजनही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पुरस्कार विजेत्यांनी आपल्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही करून द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. त्याचबरोबर, आमदार मनोज कायंदे यांनी पुढे मनोगत व्यक्त करताना जयहिंद लोकचळवळीच्या माध्यमातून कृषी, शिक्षण, सामाजिक आणि युवक क्षेत्रात सुरू असलेल्या उपक्रमांचा उल्लेख केला.

राज्यभरातील यशस्वी शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या प्रयोगांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्या माध्यमातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात ही चळवळ अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व यक्त केला.

# १० हजारांची लाच घेताना अहिल्यानगर 'सहकारी संस्था' सहाय्यक निबंधक लाचलुचपतच्या जाळ्यात

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या तक्रारीवरील निकाल देण्यासाठी आणि प्रकरण मिटवण्यासाठी १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत येथील सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था, वर्ग २) मिलिंद प्रल्हादराव राऊत यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. या कारवाईमुळे सहकार वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

नेमके प्रकरण काय? या प्रकरणातील तक्रारदार हे एका विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे सचिव आहेत. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी सोसायटीने मतदानाचा अधिकार कोणाला द्यावा, याबाबत ठराव करून तो प्रस्ताव सहाय्यक निबंधक यांच्याकडे सादर करायचा होता. त्यासाठी गावातील सोसायटीच्या सचिवांनी सर्व संचालकांची बैठक बोलावली होती व सर्वांना नोटिसाही पाठवल्या होत्या. मात्र, एक संचालक पुणे येथे राहत असल्याने त्यांना नोटीस मिळाली नव्हती. बैठक पार पडली आणि ठराव मंजूर झाला, पण नोटीस न मिळालेल्या संचालकाने त्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला आणि हा ठराव बेकायदेशीर असल्याबाबत सहाय्यक निबंधकांकडे तक्रार केली. सहाय्यक निबंधक मिलिंद राऊत यांनी या तक्रारीचा निकाल तक्रारदाराऐवजी सोसायटीच्या बाजूने लावण्यासाठी आणि हे प्रकरण परस्पर मिटवण्याच्या मोबदल्यात त्यांनी सोसायटीच्या सचिवाला सुरुवातीला २५ हजार रुपयांची मागणी केली होती. त्यापैकी १० हजार रुपये राऊत यांनी यापूर्वीच स्वीकारले होते. उर्वरित १५ हजार रुपयांसाठी त्यांचा सतत तगादा सुरू होता, त्यामुळे कंटाळून सचिवांनी ९ जुलै रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांच्याकडे रीतसर तक्रार नोंदवली.

एसीबीचा यशस्वी सापळा: तक्रारीची शहानिशा करण्यासाठी १० जुलै रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. तडजोडीअंती उर्वरित रकमेपैकी १० हजार रुपये स्वीकारण्याचे आरोपी लोकसेवक मिलिंद राऊत यांनी मान्य केले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तातडीने सापळा रचला. ठरलेल्या नियोजनानुसार, आरोपी राऊत यांनी तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या लाचलुचपतच्या पथकाने त्यांना रंगेहात अटक केली.

ही धडक कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रदीप मैराळे, आणि अप्पर पोलीस अधीक्षक कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तर प्रत्यक्ष कारवाईमध्ये पोलीस उप अधीक्षक अजित त्रिपुटे आणि अंमलदार संतोष शिंदे, वैभव सुपेकर, बाबासाहेब कराड व हारूण शेख यांनी सहभाग घेतला. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक सविता तांबे करत आहेत.

# नगर तालुक्यातील दूध संकलन केंद्रांवर धाडसत्र, 'एफडीए'च्या पथकाची कारवाई

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



नगर तालुक्यातील मेहकरी व मराठवाडी शिवरातील काही दूध संकलन केंद्रांवर अन्न व औषध प्रशासनाने शुक्रवारी (१० जुलै) छापेमारी करत भेसळीच्या संशयावरून दुधाचे नमुने तपासणीसाठी जप्त केले.

नाशिक आणि अहिल्यानगर येथील अधिकाऱ्यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. असून शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत तपास सुरू होता.

राज्यभर हॉटेल, दूध संकलन केंद्रे, स्वीट मार्ट आणि अन्य खाद्य व्यावसायिक आस्थापनांवर अन्न व औषध प्रशासनाची धडक तपासणी मोहीम सुरू आहे. त्याचा भाग म्हणून मेहकरी व मराठवाडी परिसरातील काही दूध संकलन केंद्रांमध्ये भेसळ होत असल्याची तक्रार नाशिक येथील सह आयुक्तांकडे प्राप्त झाली होती.

या तक्रारीची दखल घेत सह आयुक्त स्वतः आपल्या पथकासह शुक्रवारी अहिल्यानगरमध्ये दाखल झाले. स्थानिक सहायक आयुक्त आणि अन्न सुरक्षा निरीक्षकांच्या मदतीने पाच ते सात दूध संकलन केंद्रांची तपासणी करण्यात आली. विविध ठिकाणांहून दुधाचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

तपासणीचा अहवाल आल्यानंतरच भेसळ झाली आहे की नाही, तसेच संबंधितांवर कोणती कारवाई होणार याबाबत स्पष्टता येणार आहे. मात्र, रात्री उशिरापर्यंत अधिकृतरीत्या कोणतीही माहिती जाहीर करण्यात आलेली नव्हती.

परवाना निलंबनावरून सहाय्यक आयुक्तांवर नाराजी

अहिल्यानगर येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयात तीन सहाय्यक आयुक्त कार्यरत असून त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार कामकाज सुरू आहे. मात्र, तपासणीच्या नावाखाली काही सहाय्यक आयुक्तांकडून विनाकारण त्रास दिला जात असल्याच्या तक्रारी दूध संकलन केंद्र चालक व हॉटेल व्यावसायिकांकडून सातत्याने केल्या जात आहेत.

व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, सर्व नियमांचे पालन करूनही किरकोळ कारणांवर परवाने निलंबित करण्याची कारवाई केली जाते. याविरोधात अनेकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या असून काही दूध संकलन केंद्र चालकांनी न्यायालयातही धाव घेतली आहे.

त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. प्रशासनाकडून मात्र या आरोपांवर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

या कारवाईमुळे अहिल्यानगर तालुक्यातील दूध संकलन केंद्रे, हॉटेल, स्वीट मार्ट आणि इतर खाद्य व्यावसायिकांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लायन्स संगमनेर सॅफ्रॉन सफायरचा २१ वा पदग्रहण सोहळा उत्साहात

## जितेश लोढा अध्यक्ष, नम्रता अभंग सचिव तर चंद्रशेखर गाडे खजिनदारपदी विराजमान

संगमनेर (समर्थ गांवकरी)

समाजसेवा, नेतृत्व आणि मानवतेची अखंड परंपरा जपत कार्यरत असलेल्या आणि जगातील सर्वांत मोठा क्लब असलेल्या लायन्स क्लब ऑफ संगमनेर सॅफ्रॉन सफायरच्या २१ व्या पदग्रहण व शपथविधी सोहळ्याचा दिमाखदार कार्यक्रम नुकताच मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात जितेश लोढा यांनी अध्यक्ष, नम्रता अभंग यांनी सचिव तर चंद्रशेखर गाडे यांनी खजिनदार पदाची सूत्रे स्वीकारली.

या पदग्रहण सोहळ्यास पदग्रहण अधिकारी म्हणून माजी अध्यक्ष श्रीनिवासजी भंडारी, प्रमुख अतिथी म्हणून सेकंड व्हीडीजी एमजेएफ सुनिताजी मालपाणी, माजी मल्टिपल कौन्सिल चेअरपर्सन एमजेएफ गिरीशजी मालपाणी, रिजन चेअरमन संदीप गोंदकर तसेच झोन चेअरपर्सन चेतन भुतडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात गणेशपूजन, ध्वजवंदन आणि राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे संयोजक आणि माजी अध्यक्ष अतुल अभंग यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय मनोगतात ड. कल्याण कासट यांनी आपल्या कार्यकाळातील उपक्रमांचा आढावा घेतला. आपल्या कार्यकाळात क्लबला बेस्ट लायन्स क्लबचा किताब मिळाला ही बाब अभिमानाची असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व सदस्य, पदाधिकारी आणि मार्गदर्शकांचे सहकार्याबद्दल कासट यांनी आभार व्यक्त केले.

यानंतर माजी अध्यक्षा मिना मणियार यांच्या मार्गदर्शनाखाली नूतन सदस्यांचा दीक्षा समारंभ पार पडला. ३० नूतन सदस्यांनी यावेळी शपथ घेतली. पदग्रहण अधिकारी श्रीनिवास भंडारी यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ देत लायनिझमची मूल्ये, सामाजिक उत्तरदायित्व आणि नेतृत्वाची जाणीव करून दिली. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सेवा, समर्पण आणि संघभावना या त्रिसूत्रीवर कार्य करण्याचे आवाहन केले. ज्या क्लबच्या स्थापनेपासून आपण कार्यरत आहोत त्याच क्लबचा पदग्रहण अधिकारी होणे ही माझ्यासाठी आनंदाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

एमजेएफ सुनिता मालपाणी यांनी लायन्स चळवळीचे व्यापक कार्य, समाजोपयोगी उपक्रमांची आवश्यकता, सॅफ्रॉन सफायरच्या कार्याचा आढावा घेतला.

नवसदस्यांना टूर दी फ्रान्स चे उदाहरण देऊन प्रत्येकाने आपल्या कामात १% वाढ केली तर क्लब मोठ्या उंचीवर जाईल असे प्रतिपादन त्यांनी केले. गिरीश मालपाणी यांनी लायन्सच्या सेवाभावी परंपरेचा गौरव करत समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचा संदेश दिला.

प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष असतो आणि संघर्ष असेल तर यश मिळविण्याचा आनंद अधिक असल्याचे त्यांनी सांगितले. नूतन अध्यक्ष जितेश लोढा संघर्षमय जीवनातून पुढे आले असून ते आणि त्यांची टीम अधिक जोमाने काम करतील असेही त्यांनी सांगितले. रिजन चेअरमन संदीप गोंदकर व झोन चेअरपर्सन चेतन भुतडा यांनीही नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत आगामी वर्षासाठी विविध सेवाभिमुख प्रकल्प राबविण्याचे आवाहन केले.




"यावेळी लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोटकर वस्ती, देवगाव यांना संगणक प्रदान करण्यात आला. शिक्षक आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी सदर संगणकाचा स्वीकार केला."

यावेळी नूतन अध्यक्ष जितेश लोढा यांचा परिचय स्वाती लोढा यांनी करून दिला. आपल्या मनोगतात अध्यक्ष जितेश लोढा यांनी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, रक्तदान, वृक्षारोपण, गरजू विद्यार्थ्यांना मदत, महिला सक्षमीकरण आणि समाजहिताचे विविध नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. प्रत्येक सदस्याला सोबत घेऊन सॅफ्रॉन सफायरच्या सेवाकार्याची परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, माजी अध्यक्ष, लायन्स परिवारातील सदस्य तसेच संगमनेर व परिसरातील विविध लायन्स क्लबचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सम्राट भंडारी आणि रितीका भंडारी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी नम्रता अभंग यांनी उपस्थितांचे आभार मानले.

"We Serve" या लायन्सच्या ब्रीदवाक्याला साजेसा, सेवा, नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा हा पदग्रहण सोहळा सर्व उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

# अखिल भारत हिंदू महासभा जिल्हा उपाध्यक्ष पदी अर्जुन मेदनकर सामाजिक क्षेत्रातील कार्याचा सन्मान

आळंदी (समर्थ गांवकरी)



अखिल भारत हिंदू महासभा पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदी अर्जुन मेदनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दाखल घेत हि नियक्ती करण्यात आल्याचे अखिल भारत हिंदू महासभा वरिष्ठ उपाध्यक्ष वैभवराज रौंधळ यांनी जाहीर केली आहे.

या वेळी आंतरराष्ट्रीय संरक्षक श्री. श्री. १००८ जगतगुरु, स्वामी माधवानंद सरस्वती जी महाराज, कार्यकारी अध्यक्ष योगेद्र वर्मा जी., वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष वैभवराज शिवाजी रौंदळ, राष्ट्रीय महामंत्री डॉ. सिद्धार्थ भट्टाचार्य. राष्ट्रीय कोषाध्यक्ष साक्षी वर्मा जी, महामंत्री आचार्य अजय कृष्ण शास्त्री, राष्ट्रीय धर्म प्रचारक योगी दादानाथजी गुरु सुखनाथ जी, योगी महंत शिवनाथजी महाराज, बालयोगी ऋषिकेश नाथ जी महाराज, प्रकाशनाथ जी महाराज, योगी शीतलनाथ जी, योगी सुंदरनाथ जी., महंत सचिदानंद सरस्वती जी महाराज, महंत योगानंद सरस्वती जी, महंत किशोरनंद सरस्वती जी महाराज, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. त्यागी तसेच महाराष्ट्र राज्य प्रभारी राणीताई पवार, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष भावेश पाटील, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष आरती राजपूत, कर्नाटक प्रदेश प्रभारी अशोक कुमार नानू राठोड जी., महाराष्ट्र राज्य सरचिटणीस प्रकाश तांबट, महाराष्ट्र राज्य मीडिया विभाग उपाध्यक्ष विष्णू भाऊ बिचकुले, लक्ष्मीकांतभाऊ शिंदे, पालघर जिल्हा अध्यक्ष प्रिया शंकर राव, जिल्हा अध्यक्ष पुणे सागर निंबाळकर जी, महाराष्ट्र राज्य सदस्य दिनेश माळी,शिक शहर अध्यक्ष अंकित वाघ, नाशिक जिल्हा उपाध्यक्ष पुनम गांगुर्डे, उपाध्यक्ष पुनीत गोयल, विधी विभाग उत्तर प्रदेश अध्यक्ष रवीं. ब्रिज भुषण जी पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी झालेल्या बैठकीत नियुक्ती करून उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. पुणे जिल्ह्यातून या नियुक्तीचे स्वागत करण्यात आले आहे. आळंदी जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील, तुकाराम महाराज ताजने, विश्वकर्मा महाराज पांचाळ यांचेसह विविध क्षेत्रातील सेवाभावी संस्थानांचे पदाधिकारी यांनी देखील स्वागत केले.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून ५ हजार ५०० विशेष बसेस सोडणार

- परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक यांची पंढरपुरात घोषणा
- ग्रुप बुकींग असल्यास राज्याच्या कोणत्याही गावातून थेट पंढरपूर पर्यंत बस मिळणार

सोलापूर : (स. गांवकरी)

आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली भीमा बसस्थानची पाहणी**




आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, नगराध्यक्षा श्रीमती प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, सहा. पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री नेरपगार, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, विभागीय वाहतूक नियंत्रक अमोल गोंजारी व एसटी महामंडळाचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा" असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी सौजन्याने वागावे,अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी असे आवाहन परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी केले.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

आषाढी यात्रा शुद्ध एकादशी २५ जुलै २०२६ रोजी असून, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी वारकरी-भाविकांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी सुमारे १८ ते २० लाख वारकरी भाविक पंढरपुरात येतात. आषाढी यात्रेसाठी एस.टी ने येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या अनुषंगाने प्रवासी भाविकांच्या सुविधेसाठी महामंडाळामार्फत पंढरपूर व पंढरपूर परिसरात चार तात्पुरते बसस्थानक निर्माण करण्यात येतात. या अनुषंगाने आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक श्री.विठ्ठल कारखाना, देगाव येथे तात्पुरते भीमा बसस्थानकाची पाहणी केली.

यावेळी वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या भीमा बसस्थाकावर, सुलभ शौचालय, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक, सीसीटीव्ही यंत्रणा तसेच सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक आदी बाबतची माहिती घेतली व संबधितांना आवश्यक सुचना त्यांनी यावेळी दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अजिंक्यतारा संस्था व सातारा जिल्हा रहिवासी संघाकडून विद्यार्थ्यांचा गौरव

ठाणे (स. गांवकरी) : अजिंक्यतारा सामाजिक सेवा संस्था आणि सातारा जिल्हा रहिवासी संघ (दिवा शहर) यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात एकूण ३४० सातारकर विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमास शिवसेना कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, नगरसेवक दीपक जाधव, नगरसेवक अॅड. आदेश भगत, नगरसेविका दर्शना चरणदास म्हात्रे तसेच अन्य मान्यवरांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचाही सन्मान करून त्यांच्या शैक्षणिक यशाचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला सातारा जिल्हा रहिवासी संघाचे पदाधिकारी, सदस्य, सभासद, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने माता- भगिनी उपस्थित होत्या. उपस्थित सर्वांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उत्स्फूर्त सहकार्य केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सातारकर बांधव, विद्यार्थी, माता- भगिनी, पदाधिकारी, सदस्य आणि सभासद यांचे सातारा जिल्हा रहिवासी संघाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. भविष्यातही समाजहिताचे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

### पडघा पंचशील नगर येथे वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश



भिवंडी (स. गांवकरी) : पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भिवंडी तालुक्यातील पडघा येथील पंचशील नगर परिसरात भिवंडी कृषीउत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील व पंचशील नगर नवतरुण मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी पंचशील नगर रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रजातींच्या झाडांची लागवड करण्यात आली. परिसर अधिक हिरवागार व प्रदूषणमुक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लावण्यात आलेल्या रोपांचे संगोपन करून त्यांना मोठे करण्याची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारली. कार्यक्रमास डॉ. संजय पाटील, पडघा ग्रामपंचायत सदस्य नासिर शेख, प्रताप विषे, प्रदीप गायकवाड, संदीप गायकवाड, योगेश डी.के., स्वप्नील साळुंखे, संतोष डीके, सोमनाथ पाटील, विकास वाकळे, तुषार जाधव आणि भरत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. वाढते प्रदूषण आणि तापमान लक्षात घेता प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. पंचशील नगर परिसरातील हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत असून नागरिकांकडून त्याचे स्वागत करण्यात आले.

### अनैतिक संबंधातून मित्राने आवळला मित्राचाच गळा!

रावेर (स. गांवकरी) : जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात अनैतिक संबंधाच्या संशयातून एका तरुणाने आपल्या मित्राचाच साथीदाराच्या मदतीने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. खून केल्यानंतर मृतदेह शेतात फेकून आरोपी पसार झाले होते. मात्र, रावेर पोलिसांनी तांत्रिक आणि गोपनीय माहितीच्या आधारे अवघ्या तीन दिवसांत या खुनाचा छडा लावत दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी शेख सलमान शेख शब्बीर (वय २७, रा. उचंदा, ता. मुक्ताईनगर) यांनी रावेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा क्रमांक ३४३/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) आणि ३ (५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गणेश संजय घोरपडे (वय २७, रा. भोर, ता. रावेर) याचे मृताच्या पत्नीशी अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. याच कारणावरून दोघांमध्ये पूर्वीपासून वाद सुरू होता. या वादाचे रूपांतर अखेर खुनात झाले. एप्रिल २०२६ मध्ये ऐनपूर येथे मृताच्या पत्नीबरोबर आरोपी गणेश घोरपडे याला ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडून मारहाण केली होती. त्या घटनेचा राग आरोपीच्या मनात कायम होता. त्यावेळी त्याने मृताला, "आमच्या मध्ये आला तर तुला ठार मारेन," अशी धमकी दिल्याचे तपासात समोर आले आहे. दरम्यान, मृताची पत्नी माहेरी आशीरगड (जिल्हा बऱ्हाणपूर, मध्य प्रदेश) येथे गेली होती. त्यानंतर आरोपींनी खुनाचा कट रचल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. ९ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास आरोपी गणेश घोरपडे आणि त्याचा साथीदार मेघराज वसंत सांगळे (वय २९, रा. भोर, ता. रावेर) यांनी मृताला दारू पाजली. त्यानंतर मोटारसायकलवरून त्याला नांदूरखेडा शिवारात नेण्यात आले. तेथे दोघांनी मिळून हाताने गळा आवळून त्याचा खून केला.

## आशा कार्यकर्त्यांच्या सेवाभावी कार्याचा मेडिकव्हर हॉस्पिटलकडून सन्मान

पिंपरी- चिंचवड : (स. गांवकरी)




समाजाच्या आरोग्यसेवेत मोलाचे योगदान देणाऱ्या आशा कार्यकर्त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटल, भोसरी यांच्या वतीने 'आशा कार्यकर्ती सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात पिंपरी-चिंचवड परिसरातील ३५० हून अधिक आशा कार्यकर्त्या व टीम लीडर्स मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. या कार्यक्रमाला सौ. नम्रताताई योगेश लोंढे (नगरसेविका, इंद्रायणी नगर), सौ. चंद्राबाई कांबळे (अध्यक्षा, युनियन ऑफ अॅक्रेडिटेड सोशल हेल्थ अॅक्टिव्हिस्ट, पिंपरी-चिंचवड), सौ. सुप्रियाताई महेश चांडगुडे (नगरसेविका, शाहूनगर), सौ. आशा आहेर (उपाध्यक्षा, युनियन ऑफ अॅक्रेडिटेड सोशल हेल्थ अॅक्टिव्हिस्ट) तसेच सौ. गौरी गोळे (सचिव, भोसरी) प्रमुख उपस्थित होत्या. यावेळी आरोग्य जनजागृती, लसीकरण, माता-बाल आरोग्य, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि नागरिकांना आरोग्य सुविधांशी जोडण्यामध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या आशा कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. तसेच सौ. प्रियंका फटिंग (यमुना नगर), सौ. संगीता मोरे (जिजामाता हॉस्पिटल), सौ. सुनीता अंकुश (सांगवी), सौ. वंदना जावरे (तेलारा हॉस्पिटल) आणि सौ. अम्रपाली फुले (थेरगाव) या आशा टीम लीडर्सचाही विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात मेडिकव्हर हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध आरोग्य विषयांवर मार्गदर्शन केले. आशा कार्यकर्त्यांच्या कार्याची प्रशंसा करत त्यांना अधिक प्रभावीपणे समुदायात आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी प्रेरित करण्यात आले.

## कोळवाडीत चोरीच्या संशयावरून मोठा गोंधळ

- दोघे ग्रामस्थांच्या ताब्यात, तिघे फरार

ओतूर : (स. गांवकरी)





जुन्नर तालुक्यातील अहिल्यानगर-कल्याण महामार्गावरील कोळवाडी येथे रविवारी सकाळी चोरीच्या संशयावरून मोठा गोंधळ उडाला. संशयास्पद बोलेरो वाहनातून फिरणाऱ्या पाच जणांपैकी दोघांना ग्रामस्थांनी धाडसाने पकडले. तर हातात हत्यारे असल्याने त्यांच्या तीन साथीदारांनी घटनास्थळावरून पलायन केले. त्यातील दोघांना पोलिस व वनविभागाने पकडले तर एक जण अजूनही फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनुसिंग पापसिंग दुधानी (वय ३५, रा. हडपसर, पुणे), जिलूसिंग शेरसिंग दुधानी (वय ३८, रा. खोपोली, जि. रायगड) यांना ग्रामस्थांनी पकडले तर पंकजसिंग धारुसिंग सिकलगार (वय ४०, अंबरनाथ गोधीनगर झोपडपट्टी), करणसिंग गगनसिंग टाक (वय २७, साकला प्लॉट परभणी) या दोघांना दुपारनंतर पकडण्यात आले. या संशयितांकडील एमएच १७ एजे ३०७५ क्रमांकाची बोलेरो ही अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील कोल्हार येथून चोरीला गेल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. स्थानिक नागरिक विघ्नेश घोलप यांना ही बोलेरो संशयास्पद वाटल्याने त्यांनी कोळवाडीतील एका हॉटेलजवळ उभ्या असलेल्या वाहनाची चौकशी केली. वाहनाची चावी मागितल्यानंतर संशयित आणि घोलप यांच्यात वाद झाला. वाद वाढताच काही संशयितांनी हत्यारे बाहेर काढल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. त्यांनी एका संशयिताला घटनास्थळीच पकडले, तर दुसऱ्याला शेजारील शेतात पाठलाग करून ताब्यात घेतले. मात्र, गावठी कट्टे व इतर हत्यारे असल्याने त्यांच्या तीन साथीदारांनी ग्रामस्थांना चकवा देत तेथून पळ काढला. दरम्यान, संतप्त नागरिकांनी पकडलेल्या दोघांना मारहाण केल्याची माहिती आहे. माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना प्राथमिक उपचारासाठी ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्राथमिक चौकशीत ताब्यातील संशयितांवर राज्यातील विविध पोलीस ठाण्यांत अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच त्यांच्या वाहनातून विविध प्रकारची हत्यारे जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. फरार तिघांची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नसून, त्यांचा शोध सुरू आहे.

## देशात हरित शहर म्हणून नाशिकची ओळख निर्माण करू : मंत्री गिरीश महाजन

नाशिक : (स. गांवकरी)

'उन्नत नाशिक अभियान' अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'हरित कुंभ – हरित मान्सून' अर्थात 'मिशन ग्रीन मान्सून' अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात रविवारी नंदिनी नदीच्या दोन्ही काठांवर राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. देशात हरित शहर म्हणून नाशिक शहराची ओळख निर्माण करू, असे मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले. पिंपळगाव बहुला येथे महादेव मंदिर परिसरात नंदिनी नदीच्या काठावर व भाभा नगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, महापौर हिमगौरी आडके, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, सभापती समाधान देवरे, नगरसेवक विश्वास नांगरे, गटनेते श्याम बडोदे, इंदुमती नागरे, माधुरी बोरकर, सचिन मराठे, संध्या कुलकर्णी, चंद्रकांत खोडे, मंगला ननावरे, माजी महापौर सतीश कुलकर्णी, शेखर गायकवाड, चंद्रकिशोर पाटील, राजेश पंडित आदी उपस्थित होते. यावेळी नंदिनी नदीचे जलपूजन हे मंत्री श्री. महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. मंत्री श्री. महाजन म्हणाले की, "स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि हरित नाशिक घडविण्याचा आपण सर्वांनी संकल्प केला आहे. नागरिकांनी केलेल्या या निर्धारामुळे येणाऱ्या काळात नाशिकचा चेहरा मोहरा निश्चितच बदललेला दिसेल. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकला देशातील आदर्श, पर्यावरणपूरक आणि नियोजनबद्ध शहर म्हणून विकसित करण्यासाठी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे." "देशात सर्वाधिक वृक्ष असलेले शहर म्हणून नाशिकची ओळख निर्माण करणे हे आपल्या सर्वांचे सामूहिक ध्येय आहे. यासाठी शासनासोबत सर्व समाजघटक, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संघटना, उद्योग क्षेत्र आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. विविध सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेत या अभियानात मोलाचे योगदान दिले असून त्यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. आजपर्यंत 'मिशन ग्रीन मान्सून' अंतर्गत वृक्षलागवडीसाठी नाशिककरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा पर्यावरणाविषयीची त्यांची बांधिलकी अधोरेखित करणारा आहे, असेही त्यांनी सांगितले. 'मिशन ग्रीन मान्सून' अंतर्गत यापूर्वी शहरातील विविध भागांत वृक्षारोपण करण्यात आले आहे. तसेच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नंदिनी नदी महास्वच्छता अभियान राबवून नदीपात्र स्वच्छता, खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामे करण्यात आली. आता त्या नदीकाठावर मोठ्या प्रमाणावर देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून नंदिनी नदीला कायमस्वरूपी हरित संरक्षण कवच देण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यात येत आहे.

या अभियानात विविध सामाजिक संस्था, पर्यावरणप्रेमी नागरिक, स्वामी नरेंद्राचार्य महाराजांच्या नाणीज पीठाचे अनुयायी तसेच विविध सेवाभावी संस्थांनी सहभाग घेत वृक्षारोपण केले. वृक्षलागवडीसोबतच त्यांचे संवर्धन करण्याचाही संकल्प यावेळी करण्यात आला.

## गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अर्ध्या शिक्षणशुल्कापर्यंत शिष्यवृत्ती

मुंबई : (स. गांवकरी)

THE UNIVERSITY OF WESTERN AUSTRALIA INDIA

- जागतिक कारकिर्दीची सुरुवात पश्चिम ऑस्ट्रेलिया विद्यापीठाच्या भारतातील परिसरातून

ऑस्ट्रेलियातील अग्रगण्य संशोधनाधारित विद्यापीठांपैकी एक असलेल्या पश्चिम ऑस्ट्रेलिया विद्यापीठाने भारतातील मुंबई आणि चेन्नई येथील आपल्या शैक्षणिक परिसरांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात न जाता आपल्या देशातच जागतिक दर्जाचे शिक्षण घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त ऑस्ट्रेलियन पदवी मिळवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित आठ अग्रगण्य विद्यापीठांच्या समूहातील सदस्य असलेल्या या विद्यापीठाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती योजना जाहीर केली आहे. आगामी प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५० टक्क्यांपर्यंत गुणवत्ता-आधारित शिष्यवृत्ती मिळू शकते. शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि जागतिक दर्जाचे शिक्षण अधिकाधिक भारतीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या योजनेचा उद्देश आहे. जागतिक विद्यापीठ क्रमवारी २०२६ मध्ये हे विद्यापीठ जगात ७७ व्या क्रमांकावर असून विविध विषयांमध्ये जगातील सर्वोच्च पन्नासमध्ये दहा विषयांचा समावेश आहे. संशोधनाधारित शिक्षण, उत्कृष्ट अध्यापन आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्यात या विद्यापीठाची विशेष ओळख आहे.

## अशोका हेल्थ सिटी व अशोका वुमेन अँड चिल्ड्रेन हॉस्पिटलचे लोकार्पण

### उत्तर महाराष्ट्रात जागतिक दर्जाच्या, आधुनिक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात : लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला

नाशिक : (स. गांवकरी)

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे आरोग्य जपण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. सध्या काळात आरोग्यविषयक क्षेत्रात सरकारबरोबरच खाजगी क्षेत्रही मोठ्या प्रमाणात काम करत आहे. अशोका ग्रुपच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रात जागतिक दर्जाच्या, आधुनिक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवेच्या नव्या पर्वाची सुरुवात होत असल्याचे कौतुकोद्गार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काढले. अशोका हेल्थ सिटी आणि अशोका वुमेन अँड चिल्ड्रेन हॉस्पिटलचे लोकार्पण रविवारी लोकसभा अध्यक्ष श्री. बिर्ला यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, राजस्थानचे ऊर्जा राज्यमंत्री हिरालाल नागर , खासदार राजाभाऊ वाजे, खासदार डॉ. शोभा बच्छाव, अशोक कटारिया (चेअरमन, अशोका ग्रुप), सतीश पारख (व्यवस्थापकीय संचालक, अशोका ग्रुप), डॉ. सुशील पारख (संचालक, अशोका इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च), अंकिता पारख (संचालक, अशोका इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अँड रिसर्च) आदींची यावेळी व्यासपीठावर उपस्थित होती. यावेळी बोलताना श्री. बिर्ला म्हणाले की, अशोका हेल्थ सिटी ही अत्याधुनिक उपचार, वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि रुग्णकेंद्रित सेवा यांचा संगम असलेली एकात्मिक आरोग्यनगरी आहे.



उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या सुपर स्पेशालिटी आरोग्यसेवा स्थानिक स्तरावर यामुळे उपलब्ध होणार असल्याने ही समाधानाची बाब आहे. अशोका ग्रुपच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. बिर्ला म्हणाले की, नाशिक हे धार्मिक आणि आध्यात्मिक शहर आहे. श्री त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योतिर्लिंग पैकी एक ज्योतिर्लिंग येथे आहे. आता यासोबतच आरोग्य क्षेत्रातील नव्या वाटचालीने या शहराला नवी ओळखआय आहे. केंद्र शासनही नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनासाठी विविध योजनांच्या माध्यमातून काम करत आहे. निरोगी जीवनासाठी योग, पर्यावरणपूर्वक जीवनशैली आवश्यक आहे. आरोग्य क्षेत्रात सरकार सोबतच खाजगी क्षेत्रही कार्यरत आहे. त्याचा लाभ नागरिकांना होत असल्याचे लोकसभाध्यक्ष श्री. बिर्ला यांनी यावेळी नमूद केले. या उद्घाटन सोहळ्यास अनेक तज्ज्ञ डॉक्टर, सल्लागार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकसभाध्यक्ष श्री. बिर्ला यांचा प्रभू श्रीराम यांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अंकिता पारख यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजित पुतळा उभारणीच्या जागेची पाहणी

बिलोली (स. गांवकरी) : लोकशाहीर,साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या नियोजित पुतळ्याच्या उभारणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची बिलोली शहरात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी पुतळा उभारणीसाठी आवश्यक सुविधा, जागेची उपलब्धता, परिसराचे सुशोभीकरण तसेच भविष्यातील विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पाहणीदरम्यान पुतळा उभारणीचे काम नियोजनबद्ध व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याबाबत उपस्थितांनी सूचना मांडल्या. अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करणारे हे स्मारक शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक वैभवात भर घालणारे ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी बिलोली नगराध्यक्ष संतोष कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष भीमराव जेठे, नगरसेवक उमेश(भाऊ) बिलोलीकर नगरसेवक राजू कुडके, नगरसेवक संदीप कटारे, नगरसेवक शिवाजी गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते मुकिंदर कुडके, नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र गायकवाड, मार्तंड जेठे, संग्राम जेठे, मार्केट कमिटी संचालक बाबू कुडके, बाळासाहेब लाखे, हणमंत कुडके, चंद्रकांत आंबेकर, मधुकर कुडके, गंगाधर कुडके तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## भोकरात २२ जुलै रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान



भोकर (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्र्यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत भोकर विधानसभा मतदारसंघात बुधवार, २२ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता गणराज मंगल कार्यालय, नांदेड रोड, भोकर येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार जया अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते या अभियानाचा शुभारंभ होणार आहे. या अभियानात महसूल विभागाकडून विविध प्रमाणपत्रे, ७/१२ उतारे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ, नगरपालिकेकडून प्रधानमंत्री आवास योजना, बांधकाम परवाने, जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे, महिला बचत गट कर्जवाटप, पंचायत समितीकडून घरकुल योजनांशी संबंधित सेवा, कृषी विभागाकडून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व फळबाग लागवडीसाठी पूर्वसंमती, आरोग्य विभागाकडून आयुष्मान भारत, आभा व पीएमजीएवाय कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्रे तसेच महिला व बालविकास विभागाकडून 'लेक लाडकी' योजना व बेबी केअर किटचे वितरण करण्यात येणार आहे.

## 13 जुलै रोजी राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविण्याचे निर्देश; कार्यक्रम रद्द

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : कतार देशाचे अमीर, महामहिम शेख हमद बिन खलिफा अल थानी यांच्या दिनांक 12 जुलै 2026 रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल भारत सरकारने सोमवार, दि. 13 जुलै 2026 रोजी राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार ज्या ठिकाणी दररोज नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व शासकीय कार्यालये व संस्थांमध्ये दि. 13 जुलै रोजी राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविण्यात यावा. तसेच दि. 14 जुलै 2026 पासून राष्ट्रध्वज नेहमीप्रमाणे पूर्ण उंचीवर फडकविण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय दुखवट्याच्या दिवशी कोणतेही मनोरंजनाचे शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत, असेही केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे. सर्व संबंधित शासकीय कार्यालये, विभाग आणि संस्थांनी गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार राष्ट्रीय दुखवट्याचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## राज्यमार्ग २५१ ठरतोय मृत्यूचा सापळा?

तामसा (स. गांवकरी) : नांदेड-हदगाव राज्यमार्ग क्रमांक 251 वर अपघातांची मालिका दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना अद्याप नागरिकांच्या स्मरणातून गेलेली नसतानाच सोमवारी पुन्हा एकदा तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन तिघेजण जखमी झाले. सुदैवाने यावेळी मोठी जीवितहानी टळली असली तरी वारंवार घडणाऱ्या अपघातांमुळे या मार्गाच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तामसा शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा राज्यमार्ग 251 हा नेहमीच वर्दळीचा मार्ग मानला जातो. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत या मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. त्यातच अनेक ठिकाणी भरधाव वेगाने धावणारी वाहने, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि चौकांमध्ये आवश्यक सुरक्षाव्यवस्थेचा अभाव यामुळे अपघातांच्या घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. अपघात इतका अचानक घडला की वाहनांवरील प्रवासी रस्त्यावर कोसळले. घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. चौकात उपस्थित असलेल्या नागरिकांनी तात्काळ धाव घेत जखमींना मदत केली. काहींनी वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला तर काहींनी जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यासाठी पुढाकार घेतला. अपघातातील जखमींना प्रथम तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर प्राथमिक उपचार केले. जखमींमध्ये पिंगळी येथील स्वाती मारुती गव्हाणे आणि मारुती भीमराव गव्हाणे यांचा समावेश असून त्यांना पुढील तपासणीसाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. तर दुसऱ्या दुचाकीवरील हदगाव तालुक्यातील रुई येथील एक व्यक्ती तामसा येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाल्याची माहिती मिळाली आहे. तिन्ही जखमींना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे समजते.

# 'देऊळबंद' चित्रपट संकल्पनेचे यश सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल

## श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचे गौरव उद्गागार

अक्कलकोट : (स. गांवकरी)




देऊळबंद' चित्रपट संकल्पनेचे यश सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल असे गौरव उद्गागार श्री वटवृक्ष देवस्थान समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी काढले. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार व देऊळ बंद दोन या चित्रपटाचे दिग्दर्शक प्रविण तरडे यांच्यावर उपस्थितांनी या वेळी शुभेच्छांचा वर्षाव केला.

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे व सांस्कृतिक मंत्री आ.आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यात देऊळ बंद २ चित्रपटाच्या यशाचा कृतज्ञता सोहळा पार पडला.

अक्कलकोट वटवृक्ष निवासी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थांच्या प्रचिती संकलनेवर आधारीत व मराठी चित्रपट क्षेत्रातील सुप्रसिद्ध व दिग्गज लेखक - दिग्दर्शक प्रविण तरडे यांचा 'देऊळबंद २' या भक्तीमय मराठी चित्रपटाने चित्रपटातील प्रगल्भ स्वामी सहवास व स्वामींच्या प्रचितीच्या माध्यमातून देऊळबंद २ या चित्रपटाने केवळ ५० दिवसात १०० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. याचे पुर्ण श्रेय स्वामीभक्त दिग्दर्शक प्रविण तरडे यांच्या देऊळ बंद स्क्रीप्ट संकल्पनेला आहे म्हणून मराठी चित्रपट सृष्टीच्या इतिहासात देऊळबंद चित्रपट संकल्पनेचे यश सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल असे प्रतिपादन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे यांनी केले.

श्री स्वामी समर्थांवर आधारित देऊळ बंद २ या चित्रपटाने बॉक्स ऑफीसवर १०० कोटींचा व्यवसायिक टप्पा पुर्ण केला. यानिमीत्ताने पुण्यातील ऑक्सफोर्ड गोल्ड या सप्त तारांकीत रिसॉर्ट येथे दिग्दर्शक प्रविण तरडे यांनी आयोजीत केलेल्या 'गोष्ट मोठी १०० कोटी' या कृतज्ञता सोहळ्यातील कार्यक्रमाच्या अध्यक्षीय स्थानावरुन महेश इंगळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दिग्दर्शक प्रविण तरडे व श्री स्वामी समर्थ फेम मोहन जोशी यांनी सांस्कृतिक मंत्री आ.आशिष शेलार, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांचा श्री स्वामी समर्थांची मुर्ती, शाल, श्रीफळ देऊन सत्कार केला.

पुढे बोलताना चेअरमन महेश इंगळे म्हणाले की सुरुवातीला प्रविण तरडे यांची देऊळ बंद चित्रपट ही संकल्पना ऐकूनच थोडेसे विचीत्र वाटले, नंतर दिग्दर्शक प्रविण तरडे यांनी विनंतीद्वारे चित्रपटाची कथा निट समजावून सांगीतली व प्रदर्शनानंतर

श्री स्वामी समर्थांच्या इच्छेने देऊळ बंद या दोन्ही चित्रपटांना रसिक भक्तांनी दाद दिली याचे श्रेय दिग्दर्शक प्रविण तरडे यांच्या सोबतच तमाम स्वामी भक्तांनाही आहे असे मनोगत व्यक्त करून दिग्दर्शक प्रविण तरडे यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, निर्माते कैलाश वाणी, सिटी प्राइड थिएटर्सचे चाफळकर बंधू, अभिजीत पानसे, अवधूत गुप्ते, कुशल बद्रिके, संतोष जुवेकर, सुबोध भावे, सई ताम्हणकर, तेजस्विनी पंडित, अभिजीत खांडकेकर, हार्दीक जोशी, विजू माने, सलील कुलकर्णी, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, सुनिल पवार, तुषार मोरे, अंकूश केत, स्वप्निल गायकवाड, दशरथ लोंढे, स्वामीनाथ मुसळे यांच्यासह चित्रपट नगरी मधील गुणी कलावंत, व दिग्दर्शक उपस्थित होते. याप्रसंगी धर्मवीर चित्रपटात उत्कृष्ट अभिनय केल्याबद्दल अभिनेता प्रसाद ओक, क्षितिश दाते यांचा तर मुळशी पॅटर्न चित्रपटाबद्दल ओम भूतकर याचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, या चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी लीड मीडियाचे विनोद सातव, अश्विनी तेरणीकर आणि टीमचा विशेष सत्कार करण्यात आला.

हा चित्रपट महाराष्ट्रात गावोगावी पोहोचवण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल अतुल कुडले, रमेश परदेशी आणि विनोद वणवे त्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. तसेच कुशल कोंडे अनुप गोरे व मंदार आडकर यांनाही एक लाख रुपये मानधन तरडे यांनी जाहीर केले. यावेळी देऊळबंद १ आणि २ च्या यशानंतर प्रवीण तरडे यांनी 'देऊळबंद - ३ या चित्रपटाची घोषणा केली.


## गेटचे कुलूप तोडून चोरट्याने मोटारसायकल पळविली

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

लोहा तालुक्यातील कापसी बु येथील पत्रकार बालाजी वैजळे यांच्या गेटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने त्यांची मोटारसायकल चोरली असून उस्माननगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान पोलिसांनी सर्व पोलिस ठाण्याला कळविले असून मोटारसायकलचा शोध सुरू आहे. कापसी बु येथील माजी जिल्हा परिषद सदस्य तथा पत्रकार बालाजी वैजळे यांनी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास त्यांची एम एच २६ सी कयु ७०१८ क्रमांकाची मोटारसायकल अंगणात उभी करुन घरात झोपले असता . पहाटे त्यांची पत्नी उठून साफसफाई करत असताना मोटारसायकल अंगणात दिसली नाही. तसेच गेटचे कुलूप तुटल्याचे आढळून आले. सदर हकीगत त्यांनी पती बालाजी वैजळे यांना सांगितली. सदर मोटारसायकलचा सर्वत्र शोध घेतला असता मोटारसायकल सापडली नाही. त्यावेळी मोटारसायकल चोरीची घटना उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश मुळीक व बीट जमादार गंगाधर चिंचोरे यांना सांगितली. बीट जमादार गंगाधर चिंचोरे व पोलिस कर्मचारी माधव पवार यांनी घटनास्थळी भेट देवून पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासणी केली. मात्र मोटारसायकलचा शोध लागला नाही. दुपारी १२ वाजता पत्रकार बालाजी वैजळे यांनी उस्माननगर पोलिस ठाण्यात मोटारसायकल चोरीची फिर्याद दिली. त्यावरुन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक महेश मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार गंगाधर चिंचोरे हे करीत आहेत.

## प्रवास बुकिंगसह व्हिसा अर्ज प्रक्रिया होणार सुलभ

रियाध : (स. गांवकरी)



जगभरातील पर्यटकांसाठी प्रवास अधिक सोपा आणि अखंड करण्याच्या उद्देशाने सौदी अरेबियाने 'पॅकेज व्हिसा' हा नवा डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत पर्यटक व्हिसासाठीची अर्ज प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडण्यात आली असून, विमानप्रवास, निवास व्यवस्था आणि व्हिसा अर्ज ही संपूर्ण प्रक्रिया एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर पूर्ण करता येणार आहे.

या उपक्रमाची अंमलबजावणी सुरुवातीला निवडक आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फत टप्प्याटप्प्याने करण्यात येत असून, पुढील काळात त्याचा व्यापक विस्तार करण्यात येणार आहे.

सौदी सरकारने यापूर्वी ई-व्हिसा, व्हिसा ऑन अरायव्हल आणि स्टॉपओव्हर ट्रान्झिट व्हिसा यांसारखे विविध प्रवेश पर्याय उपलब्ध करून पर्यटन क्षेत्राला चालना दिली आहे. या उपाययोजनांमुळे २०२५ मध्ये सौदीने २९ दशलक्षांहून अधिक आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे स्वागत केले.

सौदीचे पर्यटन मंत्री Ahmed Al Khateeb यांनी सांगितले की, पर्यटन क्षेत्राच्या वेगवान विस्ताराच्या पार्श्वभूमीवर 'पॅकेज व्हिसा' हा उपक्रम पर्यटकांचा संपूर्ण प्रवास अधिक सुलभ, जोडलेला आणि अखंड करण्याच्या देशाच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. व्हिसा प्रक्रिया थेट प्रवास बुकिंगशी जोडल्यामुळे पर्यटकांना अधिक सोयीस्कर अनुभव मिळणार असून, पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारकांमधील समन्वयही अधिक मजबूत होणार आहे.

या नव्या सुविधेमुळे पात्र प्रवासी स्वतंत्रपणे विमान तिकीट, हॉटेल आणि व्हिसा अर्ज करण्याऐवजी एकाच प्रक्रियेद्वारे सर्व सेवा बुक करू शकतील. याशिवाय, पर्यटनस्थळे, विविध उपक्रम आणि अनुभव यांचाही समावेश प्रवास पॅकेजमध्ये करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे बुकिंगपासून सौदीमध्ये आगमनापर्यंतचा संपूर्ण प्रवास अधिक सुसंगत आणि त्रासमुक्त होईल.

पात्र प्रवास आणि पर्यटन सेवा प्रदात्यांसाठीही हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असून, अधिक आकर्षक प्रवास पॅकेजेस सादर करण्याची, पर्यटकांचा मुक्काम वाढविण्याची आणि त्यांना अधिक समृद्ध पर्यटन अनुभव देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

सौदी सरकारने स्पष्ट केले आहे की, 'पॅकेज व्हिसा' सुविधा केवळ निश्चित सेवा मानकांची पूर्तता करणाऱ्या आणि २४x७ ग्राहक सहाय्य उपलब्ध करून देणाऱ्या अधिकृत प्रवास व पर्यटन सेवा प्रदात्यांमार्फतच दिली जाणार आहे.

पर्यटन क्षेत्राचा सातत्याने विस्तार करत असलेल्या सौदीसाठी 'पॅकेज व्हिसा' हा जागतिक पर्यटकांना अधिक सहज, सुरक्षित आणि अखंड प्रवासाचा अनुभव देण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करूया : कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

नांदेड जिल्हा: (स. गांवकरी)




विद्यार्थी हा विद्यापीठ आणि महाविद्यालयांच्या सर्व शैक्षणिक उपक्रमांचा केंद्रबिंदू असून, त्यांच्या सर्वांगीण हितासाठी विद्यापीठ सदैव कटिबद्ध आहे. विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये अधिक प्रभावी समन्वय निर्माण करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधिक उज्ज्वल करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात सोमवारी (दि.१३ जुलै, २०२६) आयोजित महाविद्यालयांच्या विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणींच्या आढावा बैठकीत उपस्थित प्राचार्यांना मार्गदर्शन करताना अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.पराग खडके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले की, महाविद्यालयांच्या स्तरावर जशा विविध प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी असतात, त्याचप्रमाणे विद्यापीठालाही मनुष्यबळ, परीक्षा नियोजन, प्राध्यापक मान्यता, अनुदान, दीक्षांत समारंभ तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांशी संबंधित अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. मात्र, या सर्व समस्यांवर नियोजनबद्ध आणि सकारात्मक पद्धतीने उपाययोजना करण्यात येत आहेत.ते पुढे म्हणाले की, काही विषय राज्य शासनाकडे पाठविणे आवश्यक असते, काही विषय विद्यापीठाच्या विद्या परिषदेसमोर मांडावे लागतात, तर काही विषय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर अंतिम निर्णयासाठी ठेवावे लागतात. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रियेस काहीसा कालावधी लागत असला तरी महाविद्यालयांकडून प्राप्त होणाऱ्या अडचणी शक्य तितक्या कमी वेळेत सोडविण्यास विद्यापीठ प्राधान्य देत आहे.

बैठकीदरम्यान उपस्थित प्राचार्यांनी महाविद्यालयीन स्तरावर भेडसावणाऱ्या विविध समस्या, सूचना व अपेक्षा याविषयी कुलगुरूंशी मनमोकळा संवाद साधला. या चर्चेतून अनेक विधायक सूचना समोर आल्या.

## वारकऱ्यांसाठी गुडघे दुखी कंबर दुखी यावर उपचार शिबिर संपन्न

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



गेल्या सात वर्षा पासून सुरू असलेली संत ज्ञानेश्वर महाराज च्या वारकऱ्यांच्या गुडघे दुखी, कंबर दुखी या आजारावर सासवड येथे डॉ.अवधुत पवार, डॉ.संभाजी आणि त्यांचे सहकाऱ्याच्या मदतीने दोन दिवसाचे सासवड मोफत उपचार शिबिर घेऊन जवळपास तीन हजार वारकऱ्यावर मोफत उपचार करण्यात आले. हडपसर ते सासवड 32 की.मी. चा दिवेघाट मार्गे प्रवास म्हणजे या वारीतील सर्वात खडतर प्रवास होय.या वारीत वृद्ध महिला पुरुष ज्ञानेश्वर माऊलीच्या नावाचा जयघोष करत पाई चालतात त्या मुळे त्यांना गुडघे दुखी कंबर दुखी चा त्रास होतो.आपले सामाजिक कर्तव्य समजून गेल्या सात वर्षा पासून डॉ.पवार पिता पुत्र अशा वारकरी रुग्णावर सुजोक अकुप्रेसर आणि मसाज द्वारे मसाज करून तो त्रास कमी करण्याचा प्रयत्न करतात. दर वर्षी प्रमाणे याही वर्षी सासवड येथे दि. 11 आणि 12 जुलै 2026 रोजी ही सेवा देण्यात आली त्या वेळी डॉ अवधुत पवार, डॉ संभाजी पवार सौ. कान्होपात्रा पवार त्यांच्या सोबत नरेन्द्र सिंघ ग्रंथी,प्रकाश सावंत, सतीश बागल,विलास बागल. एकनाथ बागल,कान्हा देशमुख,यांचे मोलाचे सहकार्य लाभले या शिबिरासाठी सासवड नगरपरिषदेचे नगरसेवक मयूर भैया चौखंडे,शरद चौखंडे ,संतोष चौखंडे यांचे सहकारी कार्यकर्ते यांच्या स्टेज आणि इतर व्यवस्था पुरवण्यात आल्या.

# वीज समस्यांवर टोरंट पॉवरसोबत सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक

## वारंवार वीजखंडिती, आणि विलंबित दुरुस्तीबाबत तीव्र नाराजी; नियमित वीजपुरवठा व दर्जेदार ग्राहक सेवेची मागणी

भिवंडी : (स. गांवकरी)



भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असून, या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांच्या पुढाकाराने टोरंट पॉवर लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन प्रकाश भोईर यांनी यापूर्वी टोरंट पॉवरच्या व्यवस्थापनाकडे सविस्तर निवेदन सादर केले होते. त्या निवेदनाची दखल घेत पडघा येथील कार्यालयात ही बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत पडघा आणि परिसरातील वारंवार होणारी वीजखंडिती, कमी-जास्त दाबाचा वीजपुरवठा, तक्रारींचे वेळेवर निराकरण न होणे, बिघाडानंतर दुरुस्ती करण्यास होणारा विलंब तसेच ग्राहकांना अधिक तत्पर व दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, अनियमित वीजपुरवठ्यामुळे घरगुती ग्राहकांसह व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण, लघुउद्योजक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे दैनंदिन कामकाज ठप्प होत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे वीजपुरवठा अधिक स्थिर, अखंड आणि विश्वासार्ह ठेवण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली.यावेळी सामाजिक कार्यकर्त्यांनी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, दोषग्रस्त उपकरणांची तातडीने दुरुस्ती, तक्रार निवारणासाठी स्वतंत्र आणि कार्यक्षम यंत्रणा, तसेच ग्राहकांना जलद प्रतिसाद देणारी सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांच्यासह भगवान सांबरे, अजय पाटील, शैलेश बिडवी, रमेश शेलार, संजय पटेल, महेश राऊत, भास्कर पाटील, काशिनाथ शेलार, मुजाहीद नाचण, अशोक बजागे आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

टोरंट पॉवरच्या वतीने पडघा विभागाचे उपमहाव्यवस्थापक किरण ऊपरकर, व्यवस्थापक महेंद्र काटे आणि जनसंपर्क अधिकारी अमित कडू यांनी बैठकीत उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून घेतल्या. संबंधित तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय उपाययोजना करण्यात येतील, तसेच ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी कंपनी सकारात्मक भूमिका घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीनंतर पडघा परिसरातील नागरिकांनी या चर्चेतून सकारात्मक तोडगा निघेल, नियमित व अखंड वीजपुरवठा सुरू राहील आणि प्रलंबित तक्रारींचे लवकर निराकरण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रशासन आणि सेवा पुरवठादार संस्थांनी अधिक संवेदनशील व उत्तरदायी भूमिका घेण्याची गरज असल्याचेही मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# ठाण्यात रंगणार कलगीतुऱ्याचा थरार




ठाणे : (स. गांवकरी)

कोकणातील पारंपरिक लोककलेचा अनोखा ठेवा असलेल्या ‘कलगीतुऱ्या’चा थरार आता ठाणेकरांना अनुभवता येणार आहे. राम गणेश गडकरी रंगायतन येथे शुक्रवार, १७ जुलै रोजी सायंकाळी ७.३० वाजता भव्य कलगीतुऱ्याच्या जंगी सामन्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाबाबत लोककला रसिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

या बहारदार सामन्यात कलगीवाले शाहीर संदीप मोरे आणि तुरेवाले शाहीर देवेंद्र झिमन यांच्यात सवाल-जवाब, हजरजबाबी फटकेबाजी, उत्स्फूर्त सादरीकरण आणि पारंपरिक लोककलेचा रंगतदार आविष्कार पाहायला मिळणार आहे. पारंपरिक कलगीतुऱ्याचा वारसा आधुनिक सादरीकरणातून अनुभवण्याची संधी या कार्यक्रमाच्या निमित्ताने मिळणार आहे. अतुल कदम आणि सुनील कदम यांच्या निर्मितीत होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन जयवंतदादा चव्हाण आणि सुधाकरभाई सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून, तिकिटांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता कार्यक्रम हाऊसफुल होण्याची शक्यता आयोजकांनी व्यक्त केली आहे. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे, माजी महापौर अशोक वैती, युवासेना अधिकारी ऋषिकेश माने, अभिनेते मंगेश देसाई, भाऊ कदम, गौरव मोरे, उद्योजक विकास दाभाडे तसेच समाजसेवक संदीप बिरवटकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विशेष म्हणजे, कलगीतुऱ्याच्या इतिहासात प्रथमच १० भाग्यवान प्रेक्षकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत. त्यामुळे कार्यक्रमाची उत्सुकता आणखी वाढली आहे.

कोकणच्या मातीत रुजलेली ही समृद्ध लोककला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी आणि नव्या पिढीने तिचा वारसा जपावा, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. लोककलेची आवड असलेल्या प्रत्येकाने या सांस्कृतिक मेजवानीला उपस्थित राहून कलाकारांना उत्स्फूर्त दाद द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.



ठाणे : भाजप विधी सेलच्या उपाध्यक्षपदी ॲडो. योगेश जगदाळे यांची मा. आमदार नरेंद्र मेहता यांच्या नेतृत्वाखाली नियुक्ती करण्यात आली. मिरारोड येथे जिल्हाध्यक्ष दिलीप जैन यांच्या मार्गदर्शनात ॲडो. बी के सिंग यांच्या सहकार्याने डॉ सुरेश येवले, परीवहन सभापती ॲड राजकुमार मिश्रा आणि कार्यालय प्रमुख अण्णा आसीनकर यांच्या उपस्थितीत ॲड योगेश जगदाळे याची भारतीय जनता पार्टीच्या विधी सेल उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### नगदवाडी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

नारायणगाव (स. गांवकरी) : नगदवाडी ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आल्याची माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. यावेळी इ.५ वी तील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थीनी शरण्या कांबळे,शिष्यवृत्ती परीक्षेतील पात्र विद्यार्थी आरोही शिंदे,सर्वेश बढे,अंजली बढे,कृष्णाली शिंदे,रुद्र कुतळ,सादिया अन्सारी,दयानंद भोर तसेच नासा-इसरो प्रवेश परीक्षेतील पात्र विद्यार्थी मुस्कान शेख,रुद्र कुतळ,दयानंद भोर,आकाश राठोड तसेच शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षिका आशा आरेकर यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी कांदळी गावचे शिक्षणप्रेमी माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे,ग्रामपंचायत सदस्य निलेश बढे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,उपाध्यक्ष भावना बढे,अशोक बढे,रघुनाथ बढे,संगिता बढे,महेश बढे,संतोष बढे,दयानंद बढे,दिपाली जाधव,अक्षदा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार, विद्या वाघ,उज्वला कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.

### डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आज व्याख्यान

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'डॉ. शंकरराव चव्हाण अध्ययन केंद्रा'च्या वतीने डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त एका 'विशेष व्याख्यानाचे' आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान १४ जुलै २०२६ (मंगळवार) रोजी सकाळी ११:०० ते दुपारी १२:३० दरम्यान आयोजित करण्यात आले असून, या कार्यक्रमात 'मराठवाडा : काल, आज व उद्या' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली आहे. विद्यापीठाच्याअधिसभा सभागृहात आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मनोहर चासकर हे भूषवणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून सिंचन प्रकल्पग्रस्त पुनर्वसन प्राधिकरणाचे माजी उपाध्यक्ष माधव भंडारी (पुणे) (कॅबिनेट मंत्री दर्जा, महाराष्ट्र राज्य) उपस्थित राहणार असून, ते विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या निमित्ताने डॉ. शंकरराव चव्हाण यांचा विकासविषयक दृष्टिकोन आणि मराठवाड्यापुढील आजची आव्हाने यांवर चर्चा होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेच्या अभिवादनाने होणार असून, त्यानंतर कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार हे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत करतील. या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्र चव्हाण हे आपले मनोगत व्यक्त करणार आहेत. विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी, मराठवाड्याचे अभ्यासक आणि नागरिकांनी या विशेष व्याख्यानासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. दिलीप चव्हाण यांनी केले.



### पद्मशाली उपवधू-वर परिचय मेळाव्यासाठी समाज संघटनांची जोरदार तयारी

तामसा (स. गांवकरी) : येत्या 6 सप्टेंबर 2026 रोजी नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पद्मशाली समाज उपवधू-वर परिचय मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर रविवारी दिनांक 12 जुलै रोजी लेबर फेडरेशन कार्यालय,कलामंदिरजवळ, नांदेड येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीस समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी, नोंदणी प्रमुख, चौधरी प्रमुख व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बैठकीत राज्यभर सुरू असलेल्या उपवधू-वर नोंदणी मोहिमेचा आढावा घेण्यात आला. अनेक जिल्हे व तालुक्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून नोंदणीचे काम समाधानकारकपणे सुरू असल्याची माहिती देण्यात आली. मेळाव्याची माहिती समाजबांधवांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया, व्हॉट्सॲप गट तसेच स्थानिक स्तरावरील संपर्क अभियान अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी परिचय पुस्तिकेच्या छपाईसाठी आवश्यक असलेल्या नोंदणी फॉर्म, जाहिरात फॉर्म व आर्थिक संकलनाची माहिती तातडीने एकत्रित करण्यावर भर देण्यात आला. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपापल्या क्षेत्रात अधिक जबाबदारीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना योग्य जोडीदार निवडीसाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येणारा हा राज्यस्तरीय मेळावा समाजासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच मेळावा भव्य व यशस्वी करण्यासाठी सर्व समाजबांधवांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही करण्यात आले.

## श्री.जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये निवडणूक उत्साहात




आळेफाटा : (स. गांवकरी)

लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून जबाबदार नागरिक घडविण्याची प्रभावी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, मतदानाचे महत्त्व समजावे आणि नेतृत्वगुणांना चालना मिळावी या उद्देशाने श्री जे. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, आळेफाटा येथे विद्यार्थी परिषदेच्या हेड बॉय व हेड गर्ल पदासाठीची निवडणूक अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि लोकशाही पद्धतीने पार पडली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने मतदान करून प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेचा अनुभव घेतला.

निवडणूक प्रक्रियेचा शुभारंभ संस्थापक डॉ. प्रदीप गुंजाळ, सचिव डॉ. अनुजा गुंजाळ, जयहिंद कॉलेज ऑफ नर्सिंगचे कार्यकारी अधिकारी हृषीकेश खर्डे, विद्यालयाचे प्रशासक श्री. विठ्ठल म्हस्के तसेच प्राचार्या सौ. सोनल कानडे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी मान्यवरांनी उमेदवारांना शुभेच्छा देताना प्रामाणिकपणा, सेवाभाव, शिस्त आणि जबाबदारी हीच यशस्वी नेतृत्वाची खरी ओळख असल्याचा संदेश दिला. निवडणुकीपूर्वी सर्व उमेदवारांनी विद्यार्थ्यांसमोर आपली ध्येय-धोरणे, शाळेच्या विकासासाठीचे नियोजन आणि विद्यार्थीहिताचे संकल्प मांडले. प्रचारादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी आपली भूमिका प्रभावीपणे स्पष्ट केली. त्यानंतर मतदार यादीची पडताळणी करून विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध रांगेत उभे राहत गुप्त मतदानाद्वारे आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान केले. संपूर्ण मतदान प्रक्रिया अत्यंत पारदर्शक, निष्पक्ष आणि लोकशाही तत्त्वांचे काटेकोर पालन करत पार पडली. यावेळी प्राचार्या सौ. सोनल कानडे म्हणाल्या, "नेतृत्व हे केवळ पदामुळे सिद्ध होत नाही; तर प्रामाणिकपणा, जबाबदारी, सेवाभाव आणि आदर्श कृतीतून ते घडते. विजय आणि पराभव हे लोकशाहीचे अविभाज्य घटक असून त्यातून शिकत पुढे जाणे, हेच खऱ्या नेतृत्वाचे लक्षण आहे." या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मतदानाचा अधिकार, लोकशाहीची मूलभूत तत्त्वे, जबाबदार नागरिकत्व, नेतृत्वकौशल्य, निर्णयक्षमता, संघभावना आणि शिस्त यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा आणि लोकशाही मूल्यांचे प्रभावी संस्कार करणारा हा उपक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.या निवडणुकीचे नियोजन व यशस्वी आयोजन विद्यालयातील शिक्षकवृंद, निवडणूक समिती आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून उत्कृष्टरीत्या पार पडले.

## तामसा बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवर आळा

तामसा : (स. गांवकरी)

- रस्ता सुरक्षा व दक्षता अधिकारी गोविंद मुळे उतरले रस्त्यावर

राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाला फटका देणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीवर लगाम घालण्यासाठी तामसा बसस्थानक परिसरात विशेष धडक मोहीम राबविण्यात आली. परिवहन विभागाच्या निर्देशानुसार बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात 'नो पार्किंग झोन'ची कडक अंमलबजावणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान रस्ता सुरक्षा व दक्षता अधिकारी गोविंद मुळे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी केली. विनापरवाना प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे संकेत दिले संबंधितांना कडक इशारा देण्यात आला. एसटी बसस्थानक परिसरात खासगी वाहनांद्वारे सुरू असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटी महामंडळाच्या महसुलावर परिणाम होत असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन परिवहन विभागाने ही विशेष मोहीम सुरू केली आहे. अधिकारी गोविंद मुळे यांनी सांगितले की, बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतूक कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई नांदेड जिल्ह्यात सुरूच राहील. तसेच प्रवाशांनीही सुरक्षित आणि अधिकृत एसटी सेवेचाच वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

## दैनंदिन प्रशासनासाठी धर्मादाय आयुक्तांची मंजुरी

बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळ, कुंडलवाडी यांच्या व्यवस्थापनासंदर्भात उप धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग यांनी महत्त्वपूर्ण आदेश दिला आहे. संस्थेच्या बदल अहवालासंदर्भातील कायदेशीर प्रक्रियेमुळे महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रशासनात निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी उप धर्मादाय आयुक्त ममता वाय. राखडे यांनी संस्थेच्या विद्यमान नोंदणीकृत विश्वस्तांना दैनंदिन प्रशासन चालविण्यास मंजुरी दिली आहे. या आदेशामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाचा मार्ग मोकळा झाला असून विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक नुकसान टळले आहे. संस्थेच्या अधिपत्याखाली बिलोली व कुंडलवाडी शहराच्या मध्यभागी हुतात्मा गोविंदराव पानसरे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहे. या महाविद्यालयात बिलोली, कुंडलवाडी तसेच परिसरातील ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यामुळे संस्थेच्या प्रशासकीय अडचणींचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. संस्थेच्या वर्ष २०१८ मधील निवडणुकीचा बदल अहवाल (चौकशी क्र. ९६५८/२०१८) तांत्रिक कारणांमुळे १७ फेब्रुवारी २०२६ रोजी नामंजूर करण्यात आला होता. त्यामुळे 'पवित्र' पोर्टलवर प्राध्यापक भरतीची माहिती सादर करणे, पूर्णवेळ प्राचार्यांची नियुक्ती, शिक्षकांच्या पदोन्नतीसह विविध प्रशासकीय कामे रखडली होती. पवित्र पोर्टलवरील नोंदणीची अंतिम मुदत १० जुलै २०२६ असल्याने संस्थेसमोर मोठे प्रशासकीय आव्हान उभे राहिले होते. या पार्श्वभूमीवर संस्थेचे नोंदणीकृत विश्वस्त बालोजी पाटील, सुभाष गायकवाड, माधवराव पाटील आणि नागनाथराव पाटील यांनी ॲड. सी. बी. नरवाडे यांच्यामार्फत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या कलम ४१-अ अंतर्गत दैनंदिन प्रशासन चालविण्याची परवानगी मिळावी, यासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जास काही पक्षकारांनी विरोध नोंदवत बदल अहवाल नामंजूर झाल्याने मंडळाला निर्णय घेण्याचा अधिकार नसल्याचा युक्तिवाद केला होता.

## भर पावसात आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची नदीत आंघोळ

- मोठा अनर्थ घडल्यास जबाबदार कोण?
- ‘मृत्यूची वाट’ की आश्रमशाळा? भर पावसात विद्यार्थ्यांना नदीत आंघोळीसाठी पाठविण्याचा धक्कादायक प्रकार
- बारागाव-तळवली आश्रमशाळेतील धक्कादायक प्रकार; ६५३ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह



शासकीय आश्रम शाळेत अनेक गैर प्रकार उघडकीस येत आहेत. या आश्रम शाळेत आदिवासी लहान मुलं, मुली असताना मुख्यधापक आणि वस्तीगृह प्रमुखानी काळजी घेणे अपेक्षित असताना त्यानी लहानमुलांना नदीच्या वाहत्या पाण्यात अंघोळीला सोडणे अक्षम गुन्हा आहे. पाण्याच्या धारेत लहान मुलं वाहून गेली तर याला जबाबदार कोण? अपघातानंतर चौकशी लावण्यापेक्षा ते होऊ नयेत या साठी आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांनी लक्ष दयावे " -रविंद्र चंदने ,अध्यक्ष, आर.पी.आय.सेक्युलर ठाणे जिल्हा

मुरबाड : (स. गांवकरी)

मुरबाड तालुक्यातील बारागाव-तळवली येथील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी धक्कादायक बाब समोर आली आहे. मुसळधार पावसाच्या दिवसांतही विद्यार्थ्यांना नदीवर आंघोळीसाठी जावे लागत असल्याचे वास्तव समोर आले असून, वाहत्या पाण्यात विद्यार्थी बिनधास्त उड्या मारून आंघोळ करत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकारामुळे मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पहिली ते बारावी पर्यंत शिक्षण देणाऱ्या तालुक्यातील तळवली आश्रमशाळेत तब्बल ६५३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामध्ये २९७ मुली व ३५६ मुलांचा समावेश असून, त्यांना शिकविण्यासाठी सुमारे २० शिक्षक कार्यरत आहेत.मुरबाड, शहापूर, वाडा, डहाणू, जव्हार आणि कर्जत तालुक्यातील विद्यार्थी येथे निवासी स्वरूपात शिक्षण घेतात. मात्र एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी असतानाही त्यांच्या सुरक्षेकडे आणि मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. सध्या तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू असून नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना नदीत उतरविणे म्हणजे त्यांच्या जीवाशी खेळ करण्यासारखे असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.एखादा विद्यार्थी प्रवाहात वाहून गेला किंवा दुर्घटना घडली, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार, असा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही काही आश्रमशाळांमध्ये घडलेल्या गंभीर घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला होता. तरीदेखील अशा प्रकारांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेष म्हणजे, काही महिन्यांपूर्वी मोरोशी आणि वाल्हिवरे येथील आश्रमशाळां मधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना घडल्या होत्या. बारागाव-तळवली आश्रमशाळेतही यापूर्वी गंभीर प्रकार घडला होता.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत प्रशासन अधिक सतर्क राहणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात विद्यार्थी वाहत्या नदीत जीव धोक्यात घालून आंघोळ करत असल्याचे चित्र चिंताजनक आहे.याबाबत आदिवासी विकास विभाग, आश्रमशाळा प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने या प्रकाराची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शिंगवे येथे बालिकेचा विनयभंग प्रकरणी आक्रोश मोर्चा

मंचर : (स. गांवकरी)



आंबेगाव तालुक्यातील पारगाव कारखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिंगवे गावात चार वर्षीय बालिकेच्या विनयभंगाच्या घटनेच्या निषेधार्थ रविवार दि. १२ रोजी संपूर्ण गाव बंद ठेवण्यात आले.ग्रामस्थ व विविध हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीने सायंकाळी जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चामध्ये हजारो नागरिक सहभागी झाले होते. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, ह.भ.प.संग्राम बापू भंडारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रकरणातील आरोपी परप्रांतीय सलून कामगार मोहम्मद फरदीन फरीद शाह (वय २०) याच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्याला फाशीची शिक्षा देण्याची मागणी या मोर्चाद्वारे करण्यात आली.मोर्चाची सुरुवात शिंगवे गावातून करण्यात आली. यावेळी भाजप जिल्हा उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रमोद बाणखेले ,जिल्हा सचिव संदीप बाणखेले गणेश बाणखेले, एडवोकेट स्वप्न खामकर, यांच्यासह महिला, युवक तसेच विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. गावातील प्रमुख मार्गांवरून मोर्चा काढल्यानंतर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत आमदार गोपीचंद पडळकर व ह.भ.प. संग्राम बापू भंडारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले की, राज्यात महिलांवरील अत्याचार, विनयभंग व बलात्काराच्या घटना वाढत असून त्याबाबत समाजामध्ये तीव्र संताप आहे.चार वर्षीय बालिकेच्या विनयभंगाच्या प्रकरणातील आरोपीवर जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.तसेच अल्पवयीन मुलींवरील अत्याचार करणाऱ्या आरोपींवर तातडीने कायदेशीर कारवाई करून त्यांना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशीही मागणी त्यांनी व्यक्त केली.ह.भ.प. संग्राम बापू भंडारे यांनी आपल्या भाषणात येथील घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत समाजाने मुलींच्या सुरक्षेबाबत अधिक जागरूक राहण्याचे आवाहन केले. तसेच कायद्याच्या चौकटीत राहून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलेश तुळे यांनी केले. नितीन वाव्हळ यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन रुपेश तागड यांनी केले.

दरम्यान, घटनेच्या निषेधार्थ शिंगवे गावात दिवसभर बंद पाळण्यात आला.गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होत आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. जनआक्रोश मोर्चादरम्यान परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरुषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)